गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शनिवार दि. ०४.०५.२०२४ | अंक नं. ०५३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
HB Since 1935
मे. हरी बाकाजी देडगांवकर
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.



लवकरच मिळणार !
परिवारातल्या प्रत्येकाला खुश करायची संधी
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

# मतदान हवे असेल तर, बात हमारी भी सुनो...

# विद्यार्थ्यांचे ‘आत्मक्लेश व अन्नत्याग’ आंदोलन

## उड्डाणपूल, मेट्रो, स्मार्ट सिटी होतीलच पण तरुणांच्या प्रश्नांचे काय? स्मायलिंग अस्मिता विद्यार्थी संघटनेचा सवाल

नगर – जिल्ह्यातील दोन्ही लोकसभा मतदारसंघात ३० टक्के तरुण मतदार आहेत. मात्र निवडणुकीत तरुणांच्या मुख्य प्रश्नांकडेच दुर्लक्ष झाले आहे. खऱ्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी ‘बात हमारी भी सुनो’ या टॅगलाईनखाली स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेतर्फे ४ मे रोजी छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारकासमोर ‘आत्मक्लेश व अन्नत्याग’ आंदोलन करण्यात आले.



छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मारकासमोर आत्मक्लेष व अन्नत्याग आंदोलन करताना विद्यार्थी.

निवडणुकीत तरूणांच्या खऱ्या प्रश्नांसाठी कुठलाही उमेदवार बोलताना दिसत नाही. राज्यात मतदानाचा हक्क असलेल्या तरुणांची संख्या ३० टक्के आहे आणि अहमदनगर जिल्ह्यात दोन्ही मतदारसंघात १४ लाखांपर्यंत ही तरुणांची संख्या आहे. आम्ही गेल्या महिन्याभरापासून तरुणांमध्ये मतदान जागृतीचे कार्यक्रम राबविले आहेत. त्यासोबतच आपल्या प्रश्नांवरती प्रमुख उमेदवारांनी बोलले पाहिजे, आपले प्रश्न समजून घेत निवडून आल्यावर कार्यवाही करू, अशी ग्वाही दिली पाहिजे. आम्ही औद्योगिक वसाहती आणल्या, असे उमेदवारांकडून म्हंटले जाते, परंतु त्यात तरूणांच्या स्टार्टअपसाठी किती टक्के जागा राखीव आहेत याबद्दल बोलले जात नाही. अहमदनगर शहरात ऑलिम्पिकच्या धर्तीवर सहा खेळाची मैदाने हवीत, त्यासोबतच बाहेरगावाहून उच्च शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी शहराच्या विविध भागात किमान १५ वस्तीगृह हवेत, आमच्यावर अग्निवीर थोपलेच आहे तर त्यात किमान माणुसकी दाखवत अग्निवीरची मर्यादा दुप्पट करण्यात यावी, ६ अद्ययावत अभ्यासिका तसेच विद्यार्थ्यांसाठी मोफत दवाखान्याची व्यवस्था करण्यात आली पाहिजे, रस्ते, पूल, मेट्रो, स्मार्ट सिटी, औद्योगिक वसाहती होतीलच, परंतु सध्या शेती बिघडल्यामुळे वरील मागण्या त्वरित मान्य होणे व त्याची जबाबदारी उमेदवारांनी घेणे खूप गरजेचे आहे. यासाठी एक दिवसाचे आत्मक्लेश व अन्नत्याग आंदोलन केले आहे, अशी माहिती स्मायलिंग अस्मिताचे कार्याध्यक्ष यशवंत तोडमल यांनी दिली. सध्या उभ्या असलेले उमेदवार एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडत आहे. कोण कुठल्या पक्षातून आले, कुणी काय केले किंवा कोणी काय केले नाही करणार आहे, असे भाष्य केले जाते, परंतु आमच्या अडचणी काय आहेत व त्यासाठी काय केले पाहिजे यासाठी मात्र विविध विद्यार्थी संघटनांशी चर्चा कोणी केलेली नाही किंवा करतही नाही. फक्त भूलथापा दिल्या जातात राज्यसभेचे खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारकासाठी दिलेला ३० लाखांचा निधी हा दिल्लीतच अडकून पडला आहे त्याबद्दलसुद्धा उमेदवारांनी जबाबदारी घेतली पाहिजे.

आम्हाला मतदानाचा अधिकार आहे. आमच्या मागण्या जे उमेदवार पूर्ण करण्यासाठी ग्वाही देतील, अशांनाच उच्चशिक्षित तरुण व ज्या विद्यार्थ्यांना मतदानाचा अधिकार आहे, त्यांनी मतदान करावे, असे आवाहन यशवंत तोडमल यांनी केले. यावेळी अभिजित दरेकर, सौ. नंदा पांडूळे, लीना ठाकरे, अलका पोटे, कोमल पांडुळे, काजल पोकळे, प्रतीक्षा सुरोसे, प्रियंका इरकर, प्रेम थोरवे, प्रथमेश सूर्यवंशी, अक्षय साबळे, विशाल पांडुळे, शुभम सांगळे, नागेश घुगे उपस्थित होते. उन्हाचा त्रास झाला म्हणून शुभम पांडूळे यांना भोवळ आली होती. तिथे असलेल्या डॉ. अमित पवार यांनी औषधोपचार केले. उपस्थितांनी सुरूवातीला छत्रपती चौथे शिवाजी महाराजांच्या समाधी व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून घोषणाबाजी केली.

जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह, अहमदनगर
सोनोग्राफी तपासणी रु. 500/- फक्त
प्रसुतीगृह । स्त्री रोग । वंध्यत्व निवारण । लॅप्रोस्कोपी । शासनमान्य गर्भपात केंद्र
नॉर्मल व सिझेरियन डिलिव्हरी, अत्यल्प दरात दर्जेदार सेवा
जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह
पुणे बसस्टँडजवळ, स्वस्तिक चौक, हॉटेल रेडियन्सच्या पाठीमागे, अहमदनगर. मो. 74105 94116, फोन (0241) 7961062.

पाहिजेत
अहमदनगर जिल्ह्यातील नामांकित सुवर्णपेढी चंदुकाका ज्वेलर्सच्या अहमदनगर या मुख्य शोरुम साठी हवे आहेत
कॅशियर जागा-2 (M) — बँक, पतसंस्था येथे कॅशियर म्हणुन काम केल्यास प्राधान्य. टॅली सॉफ्टवेअरचे ज्ञान आवश्यक
सेल्समन जागा-4 (M/F) — तत्सम पदावर काम केल्याचा किमान 2 वर्षे अनुभव आवश्यक
हेल्पर जागा-2 (M) — 10वी/12वी पास, नापास गरजुस प्राधान्य.
अनुभवींना प्राधान्य, आकर्षक पगार दिला जाईल.
इच्छुकांनी सविस्तर अर्ज बायोडाटा सह 7 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.
शुध्दता और सुंदरता साथ साथ
चंदुकाका ज्वेलर्स – सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी –
वसंत टॉकिज रोड, अहमदनगर 0241-2321512

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

।। कुलस्वामिनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातुन
दररोज
नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट -भिस्तबाग चौक,झोपडी कॅन्टीन, तारकपूर,दिल्लीगेट, राज पॅलेस चौक,कायनेटिक चौक,केडगाव
पुणे ड्रॉप- वाघोली, खराडी बायपास,येरवडा, नवीन शिवाजीनगर बसस्टॅण्ड. बुकिंग आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज्
ऑफिस- चितळेरोड,अ.नगर
9657746555/ 9226399555

मा.श्री. अक्षयदादा कर्डिले
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा..
HOTEL AKSHAY PALACE
अहिल्यानगरचं नवं स्वाद वैभव !



उद्घाटन समारंभ
शनिवार दि. 4 मे 2024 रोजी, सायं. 6.00 वा.
स्थळ - छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर
प्रमुख उपस्थिती
माननीय नामदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील
(महसूल तथा पालकमंत्री, अहिल्यानगर)
मा. मंत्री. श्री. शिवाजीराव कर्डिले साहेब
मा. श्री. अक्षयदादा कर्डिले
व कर्डिले परिवाराने हॉटेलच्या सौंदर्यात भर टाकण्याची संधी दिल्याबद्दल सर्वांचे मन:पुर्वक आभार...
- शुभेच्छूक -
NANNAWARE GROUP
N Art Glass House
पत्ता : न्यू टिळक रोड, अ.नगर
श्री. धिरज सतिष नन्नवरे । श्री. सुरज सतिष नन्नवरे
Mo. 9970451929 Mo. 9860381818



चौथे पुण्यस्मरण
मन अजूनही मानत नाही
तुम्ही आमच्यात नाही
आता सांगावे कसे या मनाला
रोखावे कसे आसवाना
दृष्ट लागली या सुखी-संसाराला
प्रेमरुपी रत्ने देऊन आम्हाला गेलात
स्मित हास्याची ही सोज्वळ मूर्ती
जगी देऊन गेली चिरंतन स्मृती
आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली !
स्व. विठ्ठलराव देविदास देवळालकर (आण्णा)
स्व. दि. ०४/०५/२०२०
* दुःखांकित *
नितीन विठ्ठलराव देवळालकर । प्रशांत विठ्ठलराव देवळालकर
राजेंद्र मोहनराव देवळालकर
समस्त देवळालकर, भांडेकर (बीड), अंभोरे (औरंगाबाद) परिवार..
फर्म : कल्पना बॅगल्स् स्टोअर्स, सारडागल्ली, अ.नगर.
न्यु सरगम मोबाईल शॉपी, नेतासुभाष चौक, अ.नगर.

VAISHNAVI TILES & TRADING CO.
सर्व प्रकारच्या टाइल्स
ग्रॅनाइट
सॅनिटरी वेअर
पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग
C.P. फिटिंग्ज
9590151515
9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
vaishnavitiles1@gmail.com



स्व. प्रफुल्ला नरेंद्र पंड्या
(माजी उपनगराध्यक्षा)
स्व.दि. ५/५/२००९
१५ वे पुण्यस्मरण
तुझं नसणं आम्हाला पदोपदी जाणवतं
पण तुझे विचार, तुझा आदर्श
कायम आमच्यासाठी प्रेरणादायी आहेत
तुझे संस्कार व शिकवण आम्हाला सैदव बळ देत राहील...
आई, तुझ्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !
मुंजोबा स्वीटस्
पंकज नरेंद्र पंड्या व पंड्या परिवार
मार्केट यार्ड चौक, स्टेशन रोड, अहमदनगर.
फोन: २३४६८४८.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## मैत्री एकाकीपणाशी - प्रविण दवणेंचा शुभसंकेत

व्यवहाराची एक लाट हलकेच आपल्याला व्यर्थतेच्या एका किनाऱ्यावर नेते, जिथं आपण एकटे असतो. पूर्ण एकटे. नात्यांच्या सोबतीही नाही. भूतकाळाचा वेगळाच उष्णकल्लोळ मनात वादळत असतो. स्वतःवरचा विश्वासही डळमळतो. हा क्षण एकाकीपणाचा असतो. या एकाकीपणात जीवनाविषयी असंख्य प्रश्न फेर धरून असतात.

पुष्कळदा असा समज होतो की खूप यशस्वी माणसांना कलाकार व प्रसिद्ध व्यक्तींना एकाकीपण येत नाही. ते येते ते फक्त अपयशी, हरलेल्या माणसांना! हा समज पूर्ण चुकीचा आहे. स्वप्नामागं धावतांना एकाकीपणा येऊ शकतो.

या एकाकीपणाच्या तळघराला एक छिद्र पाडून ज्यांना बाहेरच्या निळाईची थोटी छलक बघता येते, त्यांच्यासाठी एकाकीपण हे एक वरदान असतं. बरोबरचं सारं जग जेव्हा अगदी दूर जातं तेव्हा आतलं एक वाट पाहणारं जग आपल्याला 'हॅलो' करतं.






एकाकीपणाशी मैत्री करणं हा उर्वरित आयुष्य आनंदी करण्याचा उपाय आहे. त्यासाठी उद्दिष्टांत विविधता ठेवल्यास एक साध्य नाही झालं की वेगळं उद्दिष्ट साद घालतं. जगण्याच्या वाटेला नवनव्या पावलांच्या शाखा फुटायला हव्यात. छंदाचे घुमारे त्यातून यावेत. अशा छंदातून आपले एकाकीपण व जीवन आशयघन होत जाईल.

# पोहण्यासाठी गेलेल्या दोन मुलांचा पाण्याच्या टाकीत बुडून दुर्दैवी मृत्यू



सौरभ उरमुडे



आदिनाथ पाटील

नगर - पाणी साठविण्यासाठी शेतात बांधलेल्या सिमेंटच्या पाण्याच्या टाकीत पोहण्यासाठी गेलेल्या २ अल्पवयीन मुलांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील पिंपळगाव वाघा गावच्या शिवारात शुक्रवारी (दि.३) दुपारी घडली. सौरभ दिलीप उरमुडे (वय १६) व आदिनाथ शंकर पाटील (वय १३) अशी या मयत मुलांची नावे आहेत.

मयत सौरभ उरमुडे याच्या वडिलांचा नर्सरीचा व्यवसाय असल्याने नर्सरीसाठी पाणी साठविण्यासाठी त्यांनी शेतात सिमेंटची पाण्याची टाकी बांधलेली आहे. शुक्रवारी दुपारी सौरभ हा त्याचा मित्र आदिनाथ याला घेवून पाण्याच्या टाकीत पोहण्यासाठी गेला होता. आदिनाथ याला चांगले पोहता येत नसल्याने तो पाण्यात बुडू लागला. त्यावेळी त्याला वाचविण्यासाठी सौरभ याने टाकीत उडी मारून पाण्यात बुडी घेतली. मात्र त्याचाही दम तुटल्याने तो ही पाण्यात बुडाला. सौरभचे मामा पोपट वाबळे हे शेजारीच राहतात. त्यांनी तातडीने पाण्याच्या टाकीकडे धाव घेत शेजाऱ्यांच्या मदतीने दोघांना बाहेर काढले. तसेच खाजगी वाहनाने नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी आणले, मात्र तेथील डॉक्टरांनी दोघांनाही उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयत सौरभ याने नुकतीच १० वी ची परीक्षा दिलेली होती. त्याच्या पश्चात आई, वडील व १ मोठा भाऊ असा परिवार आहे. तर आदिनाथ याने ६ वी ची परीक्षा दिलेली आहे. त्याच्या पश्चात आई, वडील व २ बहिणी असा परिवार आहे.

# नगरच्या बसस्थानकांमध्ये महिला करतात पाकिटमारी

## सेवानिवृत्त शिक्षकाच्या खिशातून पैसे चोरताना महिलेला पकडले

नगर - नगर शहरातील बसस्थानके चोऱ्या, पाकीटमारी करणाऱ्या गुन्हेगारांचे अड्डे बनले असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. बसस्थानकातून महिलांच्या गळ्यातील दागिने चोरीला जाण्याच्या घटना वारंवार घडत असून या चोऱ्यांचा तपास लावण्यात पोलिस अपयशी ठरत आहेत. शुक्रवारी (दि.३) दुपारी माळीवाडा बसस्थानकावर एका सेवानिवृत्त शिक्षकाचा खिसा मारताना एका चोरट्या महिलेला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना घडली आहे.

याबाबत श्रीराम रंगनाथ शिरसाठ (वय ६२, रा. शिरसाठ वाडी, ता. पाथर्डी, हल्ली रा. आंबेगाव खुर्द, जि. पुणे) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी शिरसाठ हे कामानिमित्त गावी शिरसाठवाडी येथे गेले होते. तेथील काम आटोपून ते शुक्रवारी दुपारी नगर - पाथर्डी एस.टी. बसने नगरला आले होते. नगरमधून त्यांना पुढे आंबेगावला जायचे होते. बस दुपारी १.३० च्या सुमारास माळीवाडा बसस्थानकात आली.

त्यावेळी ते बसमधून खाली उतरत असताना त्यांच्या पँटच्या पाठीमागील खिशात असलेली २४ हजार ९५० रुपयांची रोकड चोरण्याचा प्रयत्न एका महिलेने केला. आपल्या खिशातून कोणीतरी पैसे चोरत असल्याचे फिर्यादी शिरसाठ यांना जाणवताच त्यांनी त्या महिलेला रंगेहाथ पकडले. त्यावेळी काही प्रवाशांनी बसस्थानकावरील पोलिस चौकीत असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना बोलावले.

पोलिसांनी त्या महिलेला ताब्यात घेवून चौकशी केली असता तिचे नाव शिल्पा विनोद काळे (रा. पाथर्डी रोड, शेवगाव) असल्याचे समोर आले. पोलिसांनी तिला पोलिस ठाण्यात आणले. याबाबत शिरसाठ यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिस ठाण्यात सदर आरोपी महिलेविरुद्ध भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## बसस्थानकातून पाणबुडी मोटार गेली चोरीला

शेतकऱ्याने नगरच्या बाजार समितीतील दुकानातून खरेदी केलेली ११ हजार रुपये किमतीची विहिरीत बसवायची पाणबुडी मोटार माळीवाडा बसस्थानकातून चोरीला गेल्याची घटना गुरुवारी (दि.२) सायंकाळी ६.३० च्या सुमारास घडली आहे.

याबाबत शेतकरी किसन लहानू भांड (रा. धोत्रे, ता.पारनेर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी भांड हे शेतातील विहिरीत पाणबुडी मोटार बसविण्यासाठी ती खरेदी करण्यासाठी नगरमध्ये आले होते. मोटार घेवून ते बसस्थानकावर गावाकडे जाण्यासाठी गेले होते. त्यावेळी बसस्थानकातून मोटार चोरीला गेल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरोधात भा.दं वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# पश्चिम बंगालमधून अल्पवयीन मुलीला पळवून आणणारा आरोपी नगरमध्ये पकडला

नगर - पश्चिम बंगाल राज्यातून १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून आणणारा आरोपी एमआयडीसी पोलिसांनी नगरमध्ये पकडला आहे. प्रशांत उर्फ अभिजीत सजोल घोष (वय २४, रा. पश्चिम बंगाल) असे त्याचे नाव असून त्याच्यासह पिडीत अल्पवयीन मुलीला पश्चिम बंगाल मधील बारबोणी पोलीस स्टेशनच्या पोलिस अंमलदारांच्या ताब्यात देण्यात आल्याची माहिती एमआयडीसीचे स.पो.नि. माणिक चौधरी यांनी दिली.

आरोपी घोष याने अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याचा गुन्हा बारबोणी पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आलेला होता. सदर आरोपी हा नगरमधील एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या हद्दीत असल्याची माहिती बारबोणी पोलिसांना मिळताच त्यांनी स.पो.नि. माणिक चौधरी यांच्याशी संपर्क साधून आरोपी व पिडीत मुलीचे वर्णन कळविले.

एमआयडीसी पोलिसांचे पथक या दोघांचा शोध घेत असताना शुक्रवारी (दि.३) त्यांना हे दोघे नागापूर परिसरामध्ये मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेऊन सदर पीडित अपहरित मुलगी व आरोपी यास बारबोणी पोलीस स्टेशनच्या पोलिस अंमलदारांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



पश्चिम बंगाल राज्यातून १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून आणणारा आरोपी नगरमध्ये पकडल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

## सदानंद नक्का यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - प्रेमदान हडको येथील रहिवासी सदानंद दत्तात्रय नक्का (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर नालेगांव अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



सदानंद नक्का यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते धार्मिक व सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय असत.

# 'तू नोकरी कशी करतो, तुझ्यावर दावाच ठोकतो' असे म्हणत पोलिसाला शिवीगाळ करत धमकी

नगर - या पूर्वी केलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईच्या रागातून पोलिस कर्मचाऱ्याला फोन करून अश्लील भाषेत शिवीगाळ करत तु नोकरी कशी करतो असे म्हणत तुझ्यावर दावाच ठोकतो अशी धमकी दिल्याचा प्रकार शुक्रवारी (दि.३) नगरमधील तोफखाना पोलिस ठाण्यात कार्यरत पोलिस कर्मचाऱ्याच्या बाबतीत घडला आहे.

याबाबत पोलिस कर्मचारी सुधीर दत्तात्रय खाडे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून आरोपी तुषार रामभाऊ येवले (रा. किर्तीनगर, नवी सांगवी, पिंपरी चिंचवड, मूळ रा. रेनवडी, ता. पारनेर) याच्या विरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस कर्मचारी सुधीर खाडे हे या पूर्वी पारनेर पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत असताना वरिष्ठांच्या आदेशानुसार त्यांनी तुषार येवले याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली होती. त्याचा राग येवले याच्या मनात होता. त्यामुळे तो वारंवार त्यांना फोन करून शिवीगाळ करायचा. येवले याने शुक्रवारी (दि.३) सकाळी ९.३० च्या सुमारास खाडे हे तोफखाना पोलिस ठाण्यात कर्तव्यावर असताना त्यांच्या मोबाईल वर फोन करत अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तसेच तु नोकरी कशी करतो तेच बघतो, तुझ्या विरोधात सेशन कोर्टात प्रकरण दाखल करतो अशी धमकी दिली असल्याचे खाडे यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून येवले याच्या विरोधात भा.दं.वि.कलम २९४, १८९ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

१८ वे पुण्यस्मरण



कै. भगवानदास धरमदास छाब्रीया
स्व. दि. ५/५/२००६

आठवण तुमची प्रत्येक क्षणाला,
व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात,
सदैव राहतील तुमच्या
आठवणी आमच्या मनात..

आपल्या पावन
स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !
- दुःखांकित -
छाब्रीया परिवार

# निर्यातबंदी उठविण्याचा फायदा कांदा उत्पादकांना होणार नाही

नगर - केंद्र शासनाने कांदा निर्यातबंदी उठविण्याची घोषणा केली आहे मात्र किमान निर्यात मूल्य व निर्यात शुल्क लागू असल्यामुळे कांदा उत्पादकांना याचा फार फायदा होणार नाही, असे मत शेतकरी नेते व स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी मांडले आहे.

केंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालयाने ३ मे रोजी अध्यादेश काढून कांदा निर्यात खुली केल्याचे जाहीर केले आहे. यामुळे कांद्याचे भाव वाढून कांदा उत्पादकांचा मोठा फायदा होईल असे चित्र तयार केले जात आहे. मात्र निर्यात खुली करतानाच, कांद्याचे किमान निर्यात शुल्क ५५० डॉलर प्रति टन जाहीर केले आहे तसेच ४०% निर्यात शुल्क ही आकारण्यात येणार आहे. या अटींमुळे फार कांदा निर्यात होणार नाही.

किमान निर्यातमूल्य अधिक ४०% निर्यात शुल्क म्हणजे भारतातून निर्यात होणाऱ्या कांद्याचा आपल्या बंदरावरील दर किमान ६४,२०४ रुपये असेल. त्यात पुढे वाहतूक खर्च लागणार आहे. आपला प्रतिस्पर्धी पाकिस्तानातून निर्यात होणाऱ्या कांद्यावर ४०० डॉलर निर्यात शुल्क आहे त्यामुळे स्पर्धा असणार आहे.

सध्या कांद्याला १५ रुपये प्रती किलोपर्यंत दर मिळत आहे. चाळीत साठवलेल्या कांद्याचा उत्पादन खर्च किमान २५/- रुपयांपर्यंत जातो. या निर्यातबंदी उठविण्याचा निर्णयामुळे कांद्याला २० ते २३ रुपये प्रति किलोच्या दर मिळू शकतील असा अंदाज आहे. असा दर मिळाला तरी कांदा शेतकरी तोट्यातच असणार आहे. बिनशर्त निर्यातबंदी उठली असती तर ३० ते ३५ रुपये किलोच्या दरम्यान दर मिळाला असता व शेतकऱ्यांना काही नफा मिळाला असता.

कांदा उत्पादक पट्ट्यात सध्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरू आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये सरकार विरोधात नाराजी स्पष्ट दिसत आहे. ती कमी करण्यासाठी सरकारने असा निर्णय घेतला आहे. सरकारने पुन्हा शेतकऱ्यांची दिशाभूल केली आहे. कांदा उत्पादकांनी मतदान करताना याचा गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन अनिल घनवट यांनी केले आहे.



## मुकुंदनगरसह भिंगारमध्ये पोलिसांचा रुट मार्च

लोकसभा निवडणुक निर्भयपणे पार पडण्याकरीता भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांचे सह बीएसएफ च्या जवानांनी भिंगार कॅम्प पोलिस स्टेशन हद्दीत मुकूंदनगर भागात इरिगेशन मस्जिद-बॉम्बे बेकरी-दरबार चौक-सहारा कॉर्नर-नगरी चहा-संभा टपरी चौक-फकीरवाडा रोड-वाबळे कॉलनी-बॉम्बे बेकरी व इरीगेशन मस्जिद असा तसेच भिंगार शहरात पंचशिल कमान-खळेवाडी-नेहरु चौक-शिवाजी चौक-ब्राम्हण गल्ली-भिंगार वेस-गवळीवाडा-सदर बाजार या भागात रुट मार्च घेण्यात आला. रुट मार्च करीता भिंगार कॅम्प चे स.पो.नि. योगेश राजगुरु, बीएसएफ बटालियन अधिकारी व जवान तसेच आरपीसी प्लाटुनचे जवान उपस्थित होते.

# नगरमधील कांदा व्यापाऱ्याची ३६ लाखांची फसवणूक

## खरेदी करून पाठविलेल्या कांद्याचे पैसे देण्यास टाळाटाळ; इंदोरच्या व्यापाऱ्यावर नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - नगरच्या नेप्ती उपबाजारातील कांदा व्यापाऱ्याकडून मध्यप्रदेशातील इंदोर येथील व्यापाऱ्याने कांदा खरेदी करत त्या पोटीची ३६ लाख ३५ हजार १२२ रुपये रक्कम देण्यास टाळाटाळ करत फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी इंदोरच्या व्यापाऱ्यावर नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कांदा व्यापारी राहुल रामदास आंधळे यांनी फिर्याद दिली आहे. आंधळे हे नेप्ती उपबाजार येथील जयश्री ट्रेडिंग कंपनी या फर्ममध्ये भागीदार आहेत. या फर्ममार्फत ते शेतकऱ्यांनी कांदा मार्केटमध्ये विक्रीस आणलेला कांदा खरेदी करून तो परराज्यातील मोठ्या व्यापाऱ्यांना विक्री करतात. मध्यप्रदेशातील इंदोर येथील व्यापारी शाबीर शब्बीर खान याने गेल्या काही दिवसांपासून आंधळे यांच्याशी व्यवहार करत त्यांच्या कडून खरेदी केलेल्या कांद्याचे वेळेवर पैसे पाठवून त्यांचा विश्वास संपादन केला.

त्यानंतर १२ फेब्रुवारी २०२४ ते २२ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत त्याने आंधळे यांच्याकडून सुमारे ३६ लाख ३५ हजार १२२ रुपये किमतीचा कांदा खरेदी केला. या पूर्वीचे व्यवहार चांगले असल्याने आंधळे यांनीही त्याच्यावर विश्वास दाखवून कांदा पाठवला. मात्र त्यानंतर शाबीर खान याने हे पैसे देण्यास टाळाटाळ सुरु केली. अनेकदा संपर्क करूनही त्याने पैसे न पाठविल्याने आंधळे यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्यांनी शुक्रवारी (दि.३) दुपारी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी शाबीर खान याच्या विरुद्ध भा.दं.वि. कलम ४२०, ४०६ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे हे करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### बहुपयोगी कोरफड

यकृताचे विकार, पाळीचे विकार, सूज, रक्तातील अशुद्धी, मूळव्याध वगैरे विकारांमध्ये कोरफड वापरली जाते.

कोरफडीचा एक ते दिड चमचा रस साखर घालून नियमितपणे घेतल्यास शरीरात चांगली शक्ती निर्माण होते.

## पाककला

### फ्लॉवर-सुकामेवा कटलेट

**साहित्य** - एक कप फ्लॉवरचा कीस, १०० ग्रॅम खवा, तेल, एक कप पनीरचा कीस, एक कप भरड वाटलेला सुकामेवा (काजू, बदाम, चारोळी, पिस्ता, अक्रोड इ.), लिंबू, कांदा, हिरव्या मिरच्या, कोथिंबीर, हळद, मिरची पूड, गरम मसाला, दोन बटाटे (उकडून), एक चमचा मैदा, ब्रेडचा चुरा, मीठ, मोहरी, जिरे.

**कृती** - कढईत तेल तापवून मोहरी जिरे तडतडवा. त्यात हळद, कांदा, हिरवी मिरची, कोथिंबीर टाकून परता. बटाटे कुस्करून घ्या. नंतर फ्लॉवर, पनीर, बटाटे व सुकामेवा टाकून परता, खवा भाजून मिसळा. मिश्रणात दही मिसळून व्यवस्थित परतून घ्या. मिश्रण थाळीत पसरून गोल तुकड्यांत कापून घ्या. मैद्याचे साधारण दाट पीठ बनवून त्यात कटलेट बुडवून ब्रेडच्या चुऱ्यात घोळवून तेलात मध्यम जाळावर तळून घ्या. सर्व्ह करताना थोडेसे काळे मीठ टाकून टोमॅटो सॉससोबत स्वादिष्ट फ्लॉवर सुकामेवा कटलेटचा आस्वाद घ्या.

## सल्ला

### नोटेवरील डाग नाहिसे होण्यासाठी

जर नोट तेलात व तुपात भिजली असेल तर ती सुकवून पेट्रोलमध्ये बुडवा. १ मिनिटानंतर काढून सुकवा. डाग नाहीसे होतील.

## वास्तू

धातूरुपी कासव-वैदिक विष्णूपूजनात कासवांच्या धातू किंवा काष्ठ प्रतिमांचा वापर केला जाई. त्याचप्रमाणे चीनमध्येही स्वागतकक्ष किंवा प्रवेशद्वारात ते जमिनीवर असते. ते स्थिरता, आरोग्य देते.

## सौंदर्य

केस धुण्यासाठी साबण वा शाम्पूचा वापर कमी करावा. केस धुण्याच्या आदल्या रात्री खोबरेल तेलाने भरपूर मालीश करावी. दुसऱ्या दिवशी अर्धी वाटी बेसनामध्ये दही घालून पातळ द्राव बनवावा. तो केसांच्या मुळाशी लावून मालिश करावी व केस कापडाने बांधावेत. तासाभराने कोमट पाण्याने धुवावेत. एक मग पाण्यात एक लिंबू पिळावे व केसांच्या मुळांवर ओतावे. काही वेळानंतर केस टॉवेलने पुसून सुकवावेत. यामुळे कोंडा नष्ट होऊन केस लांब व दाट होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ५ मे २०२४

प्रदोष, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, उ.भा.१९।५७

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

**राशिभविष्य-**

**मेष** : आपणास घरात राहून साफसफाई, आवरासावर करायची असल्यास काही अनपेक्षित कारणे आपल्या कामात विघ्न आणू शकतात. कौटुंबिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

**वृषभ** : प्रत्येक व्यक्तीशी मृदू आणि सौम्य वागण्याचा प्रयत्न करा एखादी प्रणयपूर्ण संध्याकाळ आपल्यासाठी आनंद आणि उल्हास आणू शकते.

**मिथुन** : आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे. आपण कुणापासून प्रेरीत व्हाल. आपला जोडीदार आपल्याबरोबर राहील पळापळ देखील अधिक राहील.

**कर्क** : आजची संध्याकाळ आपणासाठी फारच रोमँटिक आणि अर्थपूर्ण होण्याची शक्यता आहे. प्रवास व बौद्धिक कामे संभवतात. आरोग्याची काळजी घ्या. पैसा खर्च होईल. अनावश्यक चिंता टाळा.

**सिंह** : आजचा दिवस आपल्या माहितीत परिवर्तन आणू शकतो. अकस्मात आलेल्या परिवर्तनांमुळे आपल्या जीवनाला नवीन दिशा मिळेल.

**कन्या** : आजच्या दिवशी किंचित विश्रांती घ्या आणि मनन-चिंतन करा. काही वेळ समस्या निवारणासाठी आणि आत्मविश्वासाच्या वाढीसाठी काढा.

**तूळ** : सामूहीक उपक्रम आणि प्रवास आपल्यासाठी श्रेयस्कर ठरतील. इतरांनी आपल्या विचारांपासून प्रभावित व्हावे यासाठी त्यांच्या समोरील आपले सादरीकरण प्रभावशाली करा.

**वृश्चिक** : आजचा दिवस आर्थिक कार्यांसाठी चांगला आहे पण काही देवाण-घेवाण करू नका. अनिर्णित राहीलेली प्रकरणे नवे प्रश्न उभे करतील. कार्य करताना व वाहन चालवताना सावधान राहा.

**धनु** : आपल्या मनातील भावना प्रकट करण्याचा दिवस. काही विशेष करण्याचा प्रयत्न करा. आज रात्री आपणास प्रेमात अत्यंत सुख मिळेल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही.

**मकर** : आज आपण एखाद्या अधिकाऱ्यामुळे असंतुष्ट राहाल. सहकाऱ्यांशी होणारे वैचारिक मतभेद टाळा. काही लोकांचे चातुर्य आपल्या मनातील शांतता भंग करेल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. शत्रूंपासून सावध राहा.

**कुंभ** : आज आपणास नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे. आपण त्यांचा योग्य वापर केल्याने आपणास चांगले यश मिळू शकते. आर्थिक पक्षाबाबत सावध राहा.

**मीन** : आपल्या कार्यक्षेत्रातील किंवा आपल्या व्यापारातील इतर लोकांशी व्यवहार करताना सावधगिरी बाळगा. अधिक श्रम करावे लागतील. एखाद्या मित्राशी झालेली भेट दिलासा देईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## शब्दगंध क्र. ६९१६ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | | |
| | ■ | ५ | | ६ | | ■ | ■ |
| ७ | ८ | ■ | ■ | ९ | | १० | ११ |
| ■ | | ■ | १२ | | ■ | १३ | |
| १४ | | | ■ | ■ | १५ | | |
| १६ | | ■ | १७ | | ■ | ■ | |
| | ■ | १८ | | ■ | १९ | | |
| २० | | | | | | ■ | ■ |

**शब्दगंध क्र. ६९१५ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भा | ऊ | सा | हे | ब | ■ | गो | प |
| ना | स | ■ | मा | न | खं | ड | ना |
| म | ■ | पं | ■ | ■ | ड | ■ | मा |
| ती | र | क | मा | न | ■ | अ | ■ |
| ■ | क्ष | ■ | हे | ■ | म | लि | न |
| शे | ण | ■ | र | ज | ■ | बा | ग |
| ल | ■ | मा | ■ | ■ | ■ | बा | र |
| का | का | सा | हे | ब | ■ | ■ | ■ |

**आडवे शब्द :-** १) दहशतवादी; हिंसाचारी ४) मातीच्या भांड्याचा फुटका तुकडा ५) लोकसभा किंवा राज्यसभेचा सदस्य ७) ध्यान; शंभर हजार ९) इकडतिकडे भटकण्याची क्रिया १२) झाडाच्या पानांपासून बनविले जाणारे वाटीसारखे पात्र १३) हात; महसूल; टॅक्स; हस्त १४) वेळ; विलंब; अवकाश १५) तीव्र उठणारी वेदना; तिडीक; कळ १६) सामान; धान्य वगैरे; जिन्नस १७) सलोखा; समेट; साम १८) नाश पावलेला भाग १९) पाणी पिण्याची शारीरिक स्थिती किंवा इच्छा; तृष्णा २०) तालुक्याचा मुख्य महसूल अधिकारी

**उभे शब्द :-** १) न हलणारे; स्थिर; स्थावर २) रेषा; रेघ; एक हिंदी चित्रपट अभिनेत्री ३) किसून काढलेला भाग ४) मिठाची चव ६) पोते वगैरे शिवण्याची मोठी जाड सुई ८) क्षमा किंवा माफ करणारा १०) काकण; बांगडी ११) धनुष्यबाण १४) पार्वतीपती; महादेव; शंकर १७) क्षणिक; पातुळ; चंचल १८) शाई १९) त्याअर्थी; होडी वगैरे उतरून जाण्याजोगी लहान खाडी

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जे चांगुलपणावर प्रेम करतात ते ईश्वराची उपासना करतात, ते आदरणीय लोकांचा सन्मान करतात आणि निरंतर ईश्वराजवळ वास करतात.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### साप खाल्ला तर माणूस मरतो का?

काय घाबरलात ना? पण घाबरू नका! काही वर्षांनी का होईना, भारतातही हॉटेलात शिरल्यावर मेनूकार्डात चिकन, मटणाच्या बरोबर सापाचे मांस, कबाब इत्यादी पदार्थ नक्कीच लिहिलेले आढळतील. आजही चिनी उपाहारगृहात सापाचे पदार्थ तुम्हाला खायला मिळतील. हळूहळू धान्याचा तुटवडा निर्माण होणारच आहे. त्यामुळे मनुष्य साप, उंदीर, बेडूक अशा अनेक प्राण्यांना फस्त करत सुटेल. अर्थात सध्याही जगाच्या काही भागात हे प्राणी खाल्ले जातात. तुम्हाला प्रश्न पडला असेल की, साप हा भयंकर विषारी असतो; मग तो खाल्ल्यास मृत्यू येणार नाही का?

साप खाल्ल्यावर माणूस मरत नाही, याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सापाचे विष फक्त त्याच्या दातांजवळील ग्रंथीतच असते. ते सर्व शरीरभर पसरलेले नसते. त्यामुळे साप खाल्ला तरी कोणी मरणार नाही. दुसरी व अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे एक प्रकारचे प्रथिनच असते. जठरातील आम्ल व इतर विकारांमुळे या प्रथिनांचे पचन होऊन जाईल. कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत.

साप चावल्यानंतर एकतर हे विष रक्तातून शरीरभर पसरते किंवा स्नायूतून चेतातंतूमध्ये व तेथून मेंदूपर्यंत पोहोचते. यामुळे सर्पविषबाधेची लक्षणे ही प्रामुख्याने रक्ताभिसरण संस्था किंवा मज्जासंस्था यांच्याशी निगडित असतात. या दोन्ही कारणामुळे आपल्या लक्षात येईल की, साप खाल्ला तरी माणूस मरत नाही.

### कृतघ्न माणूस

एका कुत्र्याने एका माणसाकडे बरीच वर्षे इमाने-इतबारे नोकरी केली. तरूणपणात अनेक प्राण्यांची शिकार करून त्याने मालकाची मर्जी संपादन केली. मालक त्याचे फार लाड करी. त्याच्या अंगावरून प्रेमाने हात फिरवी. चांगले-चुंगले खायला देई. असे बरेच दिवस चालल्यावर पुढे तो कुत्रा म्हातारा झाला. त्याचे दात पडले. पूर्वीसारखी त्याला शिकार पकडता येत नसे.

एके दिवशी मालकाबरोबर तोही शिकार धरायला रानात गेला. इतरही काही कुत्री बरोबर होती. एके ठिकाणी ससा धावताना दिसला. तशी सर्व कुत्री सशाच्या पाठी लागली, पण कोणालाही सशापर्यंत पोहोचता आले नाही. तेवढ्यात त्या म्हाताऱ्या कुत्र्याने मुसंडी मारीत सर्वांच्या पुढे धाव घेतली आणि ससा धरला, पण तोंडात दात नसल्याने त्याला सशावर पकड घेता आली नाही. हात पाय झाडून ससा त्याच्या तोंडातून निसटून दूर पळाला. असे पाहताच मालकाचा रागाचा पारा चढला. काठी घेऊन त्याने कुत्र्यालाच मारायला सुरुवात केली.

काठीचा मार बसताच म्हातारा कुत्रा कळवळून म्हणाला, ''अरे दुष्टा, किती तुझा कृतघ्नपणा! आजवर मी कित्येक प्राणी धरून तुला दिले. तुझी इतकी वर्षे इमाने इतबारे सेवा चाकरी केली. त्याचा क्षणभर तरी विचार कर. आता मी म्हातारा झालो. तोंडात दात राहिले नाहीत, म्हणून मला शिकारीवर चांगली पकड घेता येत नाही. हा काही माझा दोष नाही. मी पूर्वी केलेली तुझी सेवा आठवशील, तर तुला माझी दया येईल.''

**तात्पर्य** : एखाद्याने केलेले उपकार कधी विसरु नयेत.

## जीवन चक्र



यही अगली लाइनों में गुरु अर्जनदेव जी फ़रमा रहे हैं :

**दुरमति जाइ परम पदु पाए।**
**गुरु परसादी नामु धिआए ।।**

जब हम अज्ञान से, कुबुद्धि से परे होते हैं, अज्ञान से तात्पर्य दुनिया के ज्ञान से है। हमारी यही कोशिश होती है कि दुनिया का ज़्यादा से ज़्यादा ज्ञान हमें प्राप्त हो जाए, ताकि अपने आपको दुनिया की खुशी दे सकें। जब हम इस दुनिया के ज्ञान से परे होते हैं, तभी हम उस परम पद को पा सकते हैं, निर्मल अवस्था में पहुँच सकते हैं। जब हम पर गुरु की कृपा हो, तभी हम नाम को ध्याने वाले बन सकते हैं, सुमिरन कर सकते हैं, अपना ध्यान प्रभु की ओर कर सकते हैं और अन्दर के मंडलों में प्रवेश कर सकते हैं। प्रभु सूक्ष्म है, पवित्र है, pure है। हमारी इन्द्रियाँ हमें स्थूल से जोड़े रखती हैं, बाहर दुनिया में उलझाए रखती हैं। अगर हमें सूक्ष्म अवस्था में पहुँचना है, तो हमें अपना ध्यान अंतर्मुख करना होगा। **(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

परमपिता परमात्मा ने ही इस गुह्य राज़ को स्पष्ट किया है कि हम आत्मा और परमात्मा का निवासस्थान ऊपर में है, जिसको परमधाम, शान्तिधाम कहते हैं। अल्बर्ट आइन्स्टाईन ने भी कहा है कि भौतिक ऊर्जा को नियंत्रित करनेवाली परम शक्ति इस सृष्टि से पार ऊपर में रहती है जिसको ब्रह्माण्ड कहते हैं। परमपिता परमात्मा ज्ञान के सागर हैं, पवित्रता, शान्ति, प्रेम, सुख, आनंद, शक्तियों के सागर हैं, सर्व गुणों के भण्डार हैं। ये सब सूक्ष्म शक्तियाँ हैं जिनको हम देख नहीं सकते पर राजयोग के अभ्यास से अनुभव कर सकते हैं। भौतिकता के इस युग में इन्हीं सूक्ष्म शक्तियों की कमी है, यही आध्यात्मिक शक्ति है। आइन्स्टाइन ने भी कहा है कि भौतिकता माना विज्ञान और सूक्ष्मता माना आध्यात्म, जब यह दोनों एक साथ होते हैं तो कोई भी बात असम्भव नहीं होगी।


राजयोग के अभ्यास में हम आत्मा, परमात्मा से योगयुक्त होकर शान्ति, प्रेम, आनंद इन सूक्ष्म शक्तियों का अनुभव करते हैं और श्रेष्ठ शक्तिशाली विचारों के माध्यम से जमीन, बीज और फसल को योगदान देते हैं। इस विधि से बहुत ही सुन्दर और चमत्कारिक परिणाम देखने को मिलते हैं क्योंकि यह एक सम्पूर्ण विज्ञान है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक वेडा म्हशीवर बसून जात होता...
दुसरा वेडा : अरे ए पोलीस पकडतील तुला
पहिला वेडा : का??
दुसरा वेडा : अरे हेल्मेट कुठे घातलेस तु??
पहिला वेडा : नीट बघ फोर व्हिलर आहे !!

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता
(मूळ इंग्रजीत)



मी जी काही पाऊले उचलतो
त्याचा उगम
गुरुजींच्या घरातून निघतो

**मूळ इंग्रजी कविता - रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास - 'ज्याचं त्याचं काम...'

इयत्ता आठवीमध्ये एकाच वर्गात शिकणारे दोन मित्र. राहायला एकमेकांशेजारी. त्यामुळे शाळेत सोबतच जायचं आणि शाळा सुटल्यावर सोबतच घरी यायचं. त्यांची नावं अ आणि ब. शाळेतुन घरी आला की अ लगेच दप्तर, खुर्चीवर ठेऊन खेळायला जातो. ब शाळेतुन घरी आला की हात, पाय धुतो. आईसोबत शुभंकरोति म्हणतो. स्वैपाक सुरु करण्यापूर्वी, आई त्याला दररोज शब्दकोडं सोडवायला सांगते, ब ला काही अडलं तर उत्तरही सांगते. त्यानंतर ब गृहपाठ लिहितो. अगदी ठरवुन दररोज अर्धातास अवांतर वाचन करतो. रोजच्या सवयीप्रमाणे अ मित्रांमध्ये खेळुन आला. हात,पाय धुतले. आईने जेवायला वाढले. जेवला. गृहपाठ लिहायला घेतला पण तीन विषयांचे गृहपाठ लिहिणं शक्य झालं नाही. तो आईला म्हणाला, आई, गृहपाठ लिहायला मदत करना. आईने सपशेल नकार दिला. त्याचवेळी वडिल आले. तो वडिलांना म्हणाला, गृहपाठ लिहायला मदत करा. वडिलांनीही नकार दिला. अ रडु लागला. आई त्याच्याजवळ बसली. म्हणाली, ज्याचं काम, त्यानेच करायचं. तुला मी कधी सांगतेका आज स्वैपाक तु कर किंवा धान्य निवडुन दे म्हणून. तू दररोज शाळेतुन आलास की लगेच खेळायला जातोस. खेळायला जरुर जा पण सर्वात महत्वाचं, प्राधान्य क्रमानं करावयाचं कोणतं काम आहे हे आधी स्वतःला विचारत जा. तुला माहीत होतं की तीन विषयांचे गृहपाठ लिहायचे आहेत तर खेळायला जायचं नव्हतंस. वडिल, त्याच्या जवळ बसले. म्हणाले,मी, तुला कधी म्हणतो का आज भाजीबाजारात जाऊन तू भाजी आण, दूध केंद्रातुन दूध घेऊन ये. अ ने नकारार्थी मान हलवली. आई म्हणाली, आपल्या शेजारचा तुझा मित्र शाळेतुन आला की हात, पाय धुतो. आईसोबत शुभंकरोति म्हणतो, त्याची आई, त्याला दररोज शब्दकोडं सोडवायला सांगते, काही अडलं तर उत्तर सांगते. शिवाय तो दररोज न चुकता गृहपाठ पूर्ण करतोच. दररोज अर्धातास अवांतर वाचन करतो. त्याचं काम तो आनंदाने करतो. तू फक्त खेळायचं काम आनंदाने करतो. हे बघ मी, तुझ्याशी त्याची तुलना करत नाहीय. तो नेमकं काय - काय करतो हे सांगते. अभ्यासासोबत अवांतर वाचन करायलाच पाहिजे. थोरा-मोठ्यांची, विचारवंतांची, शास्त्रज्ञांची, राष्ट्रमाता, राष्ट्रपुरुषांची चरित्र वाचलीच पाहिजेत. शब्दकोडं सोडवणं म्हणजे बुध्दीचा उपयोग करणं, बुध्दीला थोडा तरी ताण देणं. ह्यानिमित्ताने अनेक गोष्टींची, नवनवीन शब्दांची माहिती होते. शब्दसंग्रह वाढतो. शिक्षण घेत असतांनाच एखादी कला शिकुन घे. ज्यामुळे तुला वेळ योग्य उपयोगात आणण्याचं समाधान मिळेल, आनंद होईल. शाळेत त्याच्यासोबत जातोस तसं त्याच्यातले चांगलेगुण आत्मसात कर. आम्ही दोघेही आत्ता, तुझा गृहपाठ लिहुन देऊ पण मग तुला तशीच सवय लागेल. आपले स्वतःचं काम, स्वतःच पूर्ण करण्याची सवय असावीच. विद्यार्थी आहेस तर शाळेत जाणं, अभ्यास करणं, गृहपाठ रोजच्यारोज लिहिणं, परिक्षा देणं हे फक्त तुझं काम नाही तर कर्तव्य आहे. आपलं काम दुसऱ्याने करावं हे कधीच मनात आणायचं नाही. तशी अपेक्षाही ठेवायची नाही. आपलं, स्वतःचं काम, योग्य पध्दतीने वेळेच्या आत पूर्ण केलं की स्वतःला छान वाटतं, आनंद होतो. हा एक चांगल्या सवयीचा भाग आहे. चांगल्या सवयींमुळं, चांगल्या कृती करण्या मुळं आपला फायदा होतो, आपली प्रगती होते. ब म्हणाला, आई, दादा तुम्ही फार चांगल्या प्रकारे मला सांगितलं, समजावलंत. ह्यापुढे अशी चुक मी करणारंच नाही. प्राधान्यक्रमाने काम पूर्ण करिनंच. अवांतर वाचन करणार, शाळेतुन घरी आलो की हात, पाय धुणार, शुभंकरोति म्हणणार. गृहपाठ लिहिणार. माझं कोणतंही काम, तुम्हाला सांगणार नाही. माझ्या मित्राचा आदर्श मी घेणारंच. आई म्हणाली, छान. चांगला विद्यार्थी होण्याचा प्रयत्न कर. आम्ही तुझ्या पाठिशी सोबत आहोतच. खरं तर ही अगदी साधी गोष्ट आहे. 'साहित्य सहवास'च्या माध्यमातुन लिहिणं,चांगले विचार देणं हे माझं काम मी करतो आहे, केलंच पाहिजे. 'साहित्य सहवास' मधील लेख, लघुकथा, वाचुन त्यानुसार वागण्याचा, बोलण्याचा, करण्याचा प्रयत्न करणं हे सर्वस्वी तुमचं काम आहे. प्रत्येकानं ठरवलंच पाहिजे की माझं काम मीच करणार. इतरांवर अवलंबुन राहणार नाही. इतरांना माझी कामं सांगणार नाही. आपलं काम आपणंच करणं अर्थात नवीन काही शिकणं, ज्ञान मिळवणं, स्वावलंबी होणं आहे.

(लेख क्र.४९९)

**- सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अ नगर.,
मो.९८२२७५८३८३

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

परंतु अगदी क्वचित. आठवड्यातून एकदा किंवा फार तर दोनदा. तिचे उत्तर ऐकून मी चकीतच झाले व तिला म्हणाले, अग, हे काय? तू तर म्हणालीस मित्र आहे, प्रियकर नाही. मग मित्राबरोबर असे लैंगिक संबंध ठेवतात का? तुझ्या दृष्टीनं नेमकी मित्राची व्याख्या तरी काय आहे? यामुळे उगाचच चांगल्या मित्रमैत्रिणींच्या नात्याला संशयाच्या नजरेनं बघितलं जातं.''

त्यावर ती म्हणाली, डॉक्टर, तसं काही नाही. मी काही त्याच्याशी लग्न करणार नाही. म्हणून मी त्याला प्रियकर म्हटलं नाही. तारुण्यामध्ये निर्माण होणाऱ्या कामभावनेचा आम्ही उपभोग घेतला. हळूहळू लैंगिक संबंधातून समाधान मिळाले म्हणून आमच्यामध्ये कधीतरी लैंगिक संबंध होऊ लागले. आम्ही रोजच विवाहितांसारखे असे एकत्र येत नाही. खबरदारी म्हणून मी लैंगिक संबंधानंतर २४ तासामध्ये घ्यावयाची गर्भनिरोधक गोळी लगेचच घेऊन टाकते. त्यामुळे गर्भधारणा होत नाही. या गोळ्या वापरण्याआधी दोन वेळा गर्भधारणा झाली होती. तिचे उत्तर ऐकून संस्कार नाहीसे होऊन,

**- डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# दान मजबुरीने नाही तर मजबुतीने द्यायला पाहिजे

नगर – भारतीय संस्कृतीत दान धर्माला अतिशय महत्व आहे. एखाद्याला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी दानाचा उपयोग होतो. फक्त दान देताना मनात किंतु परंतु नसावे. अनेकदा मनात येते आपण त्याला मदत केली पण तो आपल्याशी चांगला वागत नाही. हा भाव मनात अजिबात यायला नको. आपण चांगल्या मनाने मदत केली, दान दिले यातच सर्व काही आले. दान मजबुरीने नाही तर मजबुतीने द्यायला पाहिजे. तरच जीवनात खरा आनंद प्राप्त होईल असे मौलिक विचार उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज यांनी मांडले.



प्रविणऋषीजी महाराज

आनंदधाम येथे प्रवीणऋषीजी म. सा. यांचे 'दान धर्म और व्यवस्था' या विषयावर प्रवचन झाले. १९९८ मध्ये प्रवीणऋषिजी महाराज गौतम निधी संकलन अभियान सुरू केले आहे. समाजातील गरजूंना मदतीचा हात देणे, त्यांना प्रगतीसाठी प्रोत्साहन देणे या हेतूने सदर गौतम निधी संकलन केले जाते.



आनंदधाम येथे 'दान धर्म और व्यवस्था' या विषयावर प्रवचन देताना उपाध्यक्ष प्रवर प्रविणऋषीजी म.सा. छायाचित्रात उपस्थित भाविक. श्रोते, महिला व पुरुष याची झालेली गर्दी दिसत आहे.

## आनंदधाम येथे 'दान धर्म और व्यवस्था' या विषयावर प्रवचन

प्रारंभी आयोजक नरेंद्र फिरोदिया, सुनील मुनोत, सी.ए.अशोक पितळे यांनी स्वागत केले. यावेळी विलास कटारिया, संतोष शेटिया, सचिन देसर्डा, प्रविण कटारिया, सुनील बोरा, स्वप्ना कटारिया, माया धोका आदींसह भाविक उपस्थित होते.

प्रविणऋषीजी महाराज यांनी दान धर्माची महती विशद करताना सांगितले की, नदी कधी आपले पाणी पीत नाही. वृक्ष कधी आपले फळ खात नाही. त्यानुसार जो व्यक्ती तनमनधन इतरांना अर्पण करतो तो खरा मानव असतो. दान द्यायचे तर पूर्ण श्रध्देने द्या. भगवान श्रीकृष्णांना कोणी तरी विचारले की, कर्णाला सर्वात मोठा दानी म्हणतात, धर्मराज युधीष्ठिराला का नाही? तेव्हा श्रीकृष्ण एक गोष्ट सांगतात. एकदा सलग चार पाच दिवस अतिवृष्टी सुरू असते. एक ब्राह्मण युधिष्ठिराच्या दरबारात जातो. तो म्हणतो मला माझ्या मुलावर अग्नीसंस्कार करायचे आहेत, मला सुकलेले चंदनाचे लाकूड हवे आहेत. युधिष्ठिर म्हणतात, या वातावरणात मी सुकलेले लाकूड देऊ शकत नाही पण धन हवे तितके देऊ शकतो. ब्राह्मण धन घ्यायला नकार देत कर्णाच्या दरबारात जातो. कर्ण त्या ब्राह्मणाची मागणी ऐकून क्षणाचाही विचार न करता आपल्या दरबारातील चंदनाचे खांब तोडून ब्राह्मणाला देतो.

धर्मराज युधीष्ठिराने दान देताना अट ठेवली पण कर्णाने कोणत्याही अटीविना दान दिले. म्हणून त्याला दानशूर कर्ण म्हणतात. कर्णाने अगदी आपली कवच कुंडले सुद्धा दान दिली होती. शालीभद्राचीही अशीच गोष्ट आहे. त्याची परिस्थिती चांगली नसते. त्याची आई इकडून तिकडून सामग्री जमा करून खीर बनवते. तो खीर थंड होण्याची वाट पाहत असतो. इतक्यात त्याच्या घरी साधू येतात. तो विचार करतो अर्धी खीर साधूला देऊ अर्धी माझ्यासाठी ठेवतो. पण जेव्हा तो खीर वाढतो तेव्हा सगळीच साधूला देऊन टाकतो. साधू तृप्त होऊन परत जातात. आपल्या या कृत्याबद्दल शालीभद्रच्या मनात कसलाही पश्चात्ताप, दुःख नसते. त्यामुळे शालीभद्र सारखा भाव दान देताना मनात असायला हवा.

जेव्हा केव्हा दान धर्म कराल तेव्हा त्याची कुठेही वाच्यता करु नये.एकदा दान दिल्यावर पश्चात्ताप करू नये. दान गुंतवणूक नाही तर समर्पण आहे हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. गौतम निधी अभियानातून दिली जाणारी मदत मनात अहंकार आणत नाही. गौतम निधी संकलनात आज पुणे प्रथम क्रमांकावर आहे.

तळेगाव ढमढेरे येथे एका व्यक्तीचे संपूर्ण घर खाक झाले होते. गौतम निधीच्या माध्यमातून त्याचे घर नव्याने उभारून देण्यात आले. गौतम निधी अभियान पिढ्यानपिढ्या चालत राहिल. गौतम निधी कलश घरी आल्यावर घरातील लहान मुलांवरही दानधर्माचे संस्कार रूजतील असे प्रविणऋषीजी महाराज यांनी सांगितले.



श्री बिरोबा यात्रेनिमित्त निमगाव वाघा येथे भरविण्यात आलेल्या कुस्ती हगाम्यात पटकावलेली चांदीची गदा सरपंच अरुण फलके, भरत पाटील फलके, साहेबराव बोडखे आदींच्या हस्ते स्विकारताना पै. मनोज फुले.

# निमगाव वाघाच्या हगाम्यात नेप्तीच्या मनोज फुलेंनी पटकावली चांदीची गदा

नगर – श्री बिरोबा यात्रेनिमित्त भरविण्यात आलेल्या जंगी हगाम्यात नेप्तीच्या मनोज फुले या पहीलवानाने काही क्षणातच ईश्वर खरे या पहिलवानाला चितपट करत चांदीची गदा पटकावली. निमगाव वाघा (ता. नगर) येथे श्री क्षेत्र बिरोबा यात्रा भरविण्यात आली होती. यात्रा कमिटिनी तीन दिवस भरगच्च धार्मीक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात्रासाठी मोठया प्रमाणात भाविकांनी गर्दी केली होती. मंदिर परीसर विद्युत रोषनाईने सजावला होता. मुलांना खेळण्यासाठी, रहाट गाडगे, खेळण्याच्या वस्तू, खाऊचे दुकाने मोठया प्रमाणात होते.

यात्रेनिमित्त ३ मे रोजी जंगी हगाम्याचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांना कुस्त्याची आवड निर्माण व्हावी, यासाठी सुरवातीला बाल मल्लांच्या कुस्त्या लावण्यात आल्या. ४० ने ४५ मोठया कुस्त्या लावण्यात घेण्यात आल्या. जवळपास दोनशे मल्लांनी या हगाम्याला हजेरी लावली. कुस्ती जिंकण्यासाठी बक्षिस मिळवण्यासाठी मल्ल आपली कला दाखवत कुस्ती चितपट करत होते. जिल्ह्यातील मल्लानी या हगाम्याला हजेरी लावली. कुस्ती पाहण्यासाठी प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. चांगल्या कुस्तीसाठी प्रेक्षक बक्षिसाचा वर्षाव करत होते. १०० रूपयांपासून ५१ हजार रुपयापर्यत कुस्त्या लावण्यात आल्या.

या हगाम्यासाठी यात्रा कमिटीचे अध्यक्ष सरपंच अरुण फलके, उद्योजक राजेंद्र शिंदे, चंद्रचड डुरकुले, माजी सरपंच अरूण कापसे, माजी सरपंच अनिल डोंगरे, खरेदी विक्री संघाचे संचालक भरत पाटील फलके, साहेबराव बोडखे, नामदेव भुसारे, कचरु कापसे, डरकुले, बाबा जाधव, मयुर काळे सह ग्रामस्थ उपस्थित होते. पंच वसंत फलके, बाबा केदार, संजय कापसे यांनी काम पाहिले. हगाम्यासाठी प्रभाकर चौरे यांच्या स्मरणार्थ निखील चौरे यांनी गदा भेट दिली. उद्योजक राजेंद्र शिंदे यांनी शेवटच्या कुस्तीसाठी ५१ हजार रुपयाचे बक्षिस दिले. बैलगाडा शर्यतीसाठी चंद्रचुड डुरकले यांनी घाट दुरुस्तीसाठी सहकार्य केले.

# श्री नागेश्वर पार्श्वनाथ जैन तीर्थ येथे आयोजित पारिवारिक शिबिरात मिळतेय नवी ऊर्जा

## श्री वि. कुलबोधी सुरीश्वरजी महाराज साहेब यांचे अनमोल मार्गदर्शन

नगर – राजस्थान स्थित पवित्र श्री नागेश्वर पार्श्वनाथ जैन तीर्थ येथे आचार्य श्री वि. वरबोधी सुरीश्वरजी महाराज साहेब यांचे शिष्य श्री वि. कुलबोधी सुरीश्वरजी महाराज साहेब यांच्या सान्निध्यात संबोधी परिवारातर्फे ३ दिवसीय पारिवारिक शिबिर घेण्यात येत आहे. यात सकाळी ५.३० ते रात्री १० वाजेपर्यंत विविध कार्यक्रम होत आहेत. या शिबिराचा सुमारे ६५० स्त्री, पुरूष व सुमारे २५० मुले लाभ घेत आहेत.



जीवनात सुप्रभात आणणारे परमपूज्य आचार्य श्री कुलबोधी सुरीश्वरजी महाराज साहेब प्रापंचिक जीवनात सुख, शांती, ज्ञान, नैतिकता यासारखे आमूलाग्र बदल कसे घडवून आणता येईल याविषयी अनमोल मार्गदर्शन करत आहेत.

राई प्रतिक्रमण (प्रायश्चित घेण्याची प्रक्रिया), परमेश्वराची अष्टांग पूजा, गुरुवाणी (प्रवचन), दिव्य प्रतिक्रमण, परमेश्वराची भक्ती, विविध स्पर्धा, प्रश्नमंजुषा, शिबिरार्थींचे मनोगत कार्यक्रम अशा कार्यक्रमात सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला. महाराज साहेब जीवनातील विविध पैलू आणि विषयांवर प्रेरणादायी प्रवचन देतात. त्यामुळे सकारात्मक बदल सुरू होतो.

शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला नवी ऊर्जा आणि अनुभूती येते. संबोधी परिवारातर्फे दरवर्षी विविध ठिकाणी आचार्य श्री कुलबोधी सुरीश्वरजी महाराज साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन केले जाते. यामध्ये देशभरातील भाविक सहभागी होत असतात.

# माझ्या कामावर मनापासून प्रेम केले : हेमंत गुणे

नगर – प्रत्येक क्षणी आपल्या सोबत' असणाऱ्या भारताच्या बलाढ्य आयुर्विमा महामंडळाच्या ९५४ अहमदनगर शाखेत ३७ वर्षे सेवा करुन सेवानिवृत्त झालेले विकास अधिकारी हेमंत गुणेंचा सेवापूर्ती समारंभ झाला. याप्रसंगी हेमंत गुणे म्हणाले की ह्यापुढे प्रत्येक महिना, हा मार्च महिना समजून काम करणे गरजेचे आहे. ९५४ शाखा ही एक वेगळीच जादू आहे. येथे जो व्यक्ती येतो तो प्रमोशन घेऊनच जातो. ही शाखा वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रत्येकाची कामाची चांगली पद्धत आहे. प्रत्येकाकडून काही चांगले असे मी शिकत गेलो. डेव्हलपमेंट ऑफिसर्स, एजंट्स, कर्मचारी यांच्याकडून मला खूप शिकायला मिळाले. मार्केटमधल्या माणसांनी शिकलेच पाहिजे. हे नेमके असेच का? तसेच का? या प्रश्नांची उत्तरे मिळवताना प्रत्येक गोष्ट शिकत गेलो. आय एम नॉट मास्टर हे स्वतःला सांगत गेलो आणि प्रत्येकाकडून माहिती घेतली, ज्ञान मिळवले म्हणून चांगली सेवा करु शकलो, माझी विकास अधिकारी ही भूमिका निभावू शकलो. मला, सर्व सहकारी कर्मचारी, एजंट्स, ऑफिसर्स यांनी वेळोवेळी खूप चांगल्या प्रकारे सहकार्य केलेले आहे, त्या सर्वांचे आभार मानतो. हेमंत गुणेंना निरोप देण्याचा समारंभ नुकताच झाला.



आयुर्विमा महामंडळाच्या अहमदनगर शाखेतून ३७ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झालेले विकास अधिकारी हेमंत गुणे यांचा पत्नी सौ. मीनल गुणे यांचा सत्कार करताना चीफ मॅनेजर सुरेश गायकवाड, श्रीकृष्ण धकाते, सौ. इंदिरा भालसिंग आदी.

त्याप्रसंगी अध्यक्षस्थानी ९५४ शाखेचे चीफ मॅनेजर (DM) सुरेश गायकवाड म्हणाले की, गुणे साहेबांच्या अंगी असणाऱ्या गुणांचा आपण अंगीकार केला पाहिजे आणि ते गुण कृतीतून आपण घेतले पाहिजेत. या आत्मसात केलेल्या गुणांचा उपयोग आपल्या, शाखेच्या प्रगतीसाठी होणारेच आहे. वादळ झेलणाऱ्या ज्या व्यक्ती असतात, त्यामध्ये गुणे आहेत, आत्मविश्वासु व्यक्तिमत्व आहे. यापुढेही त्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले. सौ.गुणे वहिनींचा महत्वाचा रोल, गुणे यांच्या आयुष्यात आहे, त्याबद्दलही कृतज्ञता व्यक्त केली.

हेमंत गुणे आणि सौ. मीनल गुणे यांचा, गौरवशाली ९५४ शाखेच्यावतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विकास अधिकारी श्रीकृष्ण धकाते, गणेश बेलसरे, अजिंक्य शिंदे, सेवानिवृत्त विकास अधिकारी संजय चिकटे, संजय जगदाळे, विकास बडे, प्रितम पवार, नागरगोजे, एजंट सुभाष मुथियान, ABM (S) मकरंद देशपांडे, जयंत कुलकर्णी, सौ.इंदिरा भालसिंग, सौ.दीपा गोटे, सुनील राऊत यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सुनील राऊत यांनी केले.

# श्री मार्कंडेय मंदिर देवस्थानच्या जीर्णोद्धाराला विरोध नाही

## पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्धम यांची माहिती

नगर – गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिर येथे बेकायदेशीर लोकांकडून स्वयंघोषित ट्रस्टी यांच्यामार्फत जीर्णोद्धार करण्याचे ठरले आहे मात्र या ठिकाणी पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची मार्कंडेय शाळा असून समन्वयाने प्रश्न मार्गी लागावा यासाठी मंदिर जीर्णोद्धाराचे समन्वयक श्रीकांत छिंदम व मुख्याध्यापक संदीप छिंदम यांच्या उपस्थितीत समाजाची बैठक झाली. शाळेला जागा द्यावी. बांधकाम करताना मंदिर व शाळेच्या बांधकामाचे प्लॅन एकत्र मंजुरीसाठी पाठवण्यात यावे आणि एकत्र बांधकाम सुरू करावे तसेच देवस्थान व शाळा यांच्यात बांधकामाबाबत करार करण्यात यावा असे ठरले असताना हा प्रश्न मार्गी लागावा यासाठी पद्मशाली समाजाच्या अनेक वेळा बैठका झाल्या मात्र मूळ प्रश्न बाजूला ठेवून समाजाची दिशाभूल करण्याचे काम करण्यात येत असून पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचा श्री मार्कंडेय मंदिर देवस्थानच्या जीर्णोद्धाराला विरोध नसून बेकायदेशीर स्वयंघोषित ट्रस्टला विरोध आहे अशी माहिती पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्धम यांनी दिली



गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिराबाबत पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची बैठक झाली. याप्रसंगी अध्यक्ष बाळकृष्ण सिद्धम, सचिव डॉ.रत्ना बल्लाळ, शरद क्यादर, राजेंद्र म्याना, शंकर सामलेटी, मुख्याध्यापक संदीप छिंदम आदी.

गांधी मैदान येथील श्री मार्कडेय मंदिराबाबत पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची बैठक झाली. यात अध्यक्ष बाळकृष्ण सिद्धम यांनी माहिती दिली. यावेळी सचिव डॉ.रत्ना बल्लाळ, शरद क्यादर, राजेंद्र म्याना, शंकर सामलेटी, मुख्याध्यापक संदीप छिंदम आदी उपस्थित होते.

शरद क्यादर म्हणाले की, श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्ट या संस्थेवर आज अखेर कोणीही अधिकृत ट्रस्टी व पदाधिकारी नाहीत. श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्ट यांच्याबद्दल अर्ज धर्मादाय उप आयुक्त अहमदनगर यांनी कायदेशीर फेटाळला आहे. असे असताना पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या विरोधात काम करणारे काही लोक व विरोधी गटातील काही विघ्नसंतोषी लोक हे एकत्र येत त्यांनी बनावट निवडणूक घेतल्याची कागदपत्रे तयार करून तसा अर्ज सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्या कार्यालयात दाखल केलेला आहे. त्या अर्जावर हरकत घेतलेली आहे असे असतानाही आम्हाला असे समजते की काही स्वयंघोषित विश्वस्त यांनी विघ्नसंतोषी लोकांना हाताशी धरून चुकून धर्मदाय आयुक्त यांच्या परिशिष्ट १ वर नाव असल्याचा गैरफायदा घेऊन एका ८५ वर्षीय वृद्ध इसमाची फसवणूक करून अहमदनगर महापालिकेच्या बांधकाम परवानगी अर्जावर सही घेऊन तसेच परवानगीसाठी अर्ज सादर करताना खोटे कागदपत्रे सादर करून आयुक्त अहमदनगर महापालिका यांच्याकडून बांधकाम परवानगी मिळवली, मात्र कोणत्याही धर्मदाय संस्थेच्या मालमत्तेची विक्री, सुधारणा, जीर्णोद्धार करायचा असल्यास धर्मदाय आयुक्त यांच्याकडे लेखी अर्ज सादर करून त्याची लेखी परवानगी घेऊन त्यानंतरच बांधकाम परवानगी मिळते. पण श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान यांनी अशी कोणतीही परवानगी घेतलेली नाही व तसा कोणताही अर्ज अखेर सादर केलेला नाही. तरी देखील बेकायदेशीरपणे भूमिपूजन सोहळा करण्याचे ठरविलेले आहे अशी माहिती यावेळी दिली

श्री मार्कंडेय मंदिर जीर्णोद्धार सोहळा बेकायदेशीर व तथाकथित लोकांनी आयोजित केलेला आहे. याच्या नावाखाली पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ व श्री मार्कंडेय विद्यालय यांच्या ताब्यात वर्षानुवर्ष असलेल्या इमारती पाडण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे. या शाळेमध्ये सुमारे १५०० ते १७०० विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तसेच कोतवाली पोलीस स्टेशन यांनी अर्जाबाबत माहिती घेत मार्कंडेय देवस्थान वाद धर्मदाय आयुक्त पुणे यांच्या कोर्टात प्रलंबित आहे. तसेच धर्मदाय आयुक्त अहमदनगर यांच्या कोर्टात अर्ज प्रलंबित आहे. तरी आपण दिलेल्या अर्जाबाबत आपण या धर्मदाय आयुक्त यांच्या कोर्टात दाद मागावी तसेच सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे बांधकाम अथवा काही काम करू नये याबाबत गैर अर्जदार यांना सीआरपीसी १४९ प्रमाणे नोटीस बजावणी करण्यात आली आहे, अशी माहिती यावेळी शरद क्यादर यांनी दिली.



कामरगाव येथील संवाद सभेत बोलताना डॉ. सुजय विखे पाटील.

# नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी माझा अनुक्रमांक तीन : डॉ. सुजय विखे पाटील

नगर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या पर्वाची ही वाटचाल सुरू आहे. याच धर्तीवर मला अनु. क्र. ३ मिळाला आहे. यामुळे नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी अनु. क्र. ३ चे बटन दाबा असे आवाहन महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. ते नगरमधील एका संवाद सभेत बोलत होते.

नरेंद्र मोदी यांची ७ मे रोजी नगरमध्ये सभा होणार आहे. या सभेसाठी डॉ. सुजय विखे पाटील यांनी ठिकठिकाणी संवाद सभांचा वेग वाढविला आहे. नगर जिल्ह्यातील कामरगाव येथे अशाच संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना डॉ. विखे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांच्या मागील दोन पर्वातील केलेल्या कामामुळे देशात मोदींच्या गॅरंटीवर लोकांचा गाढा विश्वास आहे. यामुळे त्यांची तिसऱ्या पर्वाकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे. आणि हा नियतीचा योगायोग आहे की, त्यांच्या या वाटचालीत मला संधी देण्यासाठी तीन क्रमांकाचे बटन मिळाले आहे. यामुळे आता विजयांची चिंता उरली नाही.

नरेंद्र मोदीच्या विकासाच्या रथावर जिल्ह्याचा विकास साधण्याचे ध्येय मी उराशी बांधले आहे. म्हणुन तुम्ही सुद्धा या तिसऱ्या पर्वाचे साक्षिदार होण्यासाठी आणि नरेंद्र मोदी यांच्या हाती देश देण्यासाठी अनु. क्रं. ३ चे बटण दाबावे असे त्यांनी सांगितले.

सदर संवाद सभेत जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांच्यासह विविध स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.



ज्येष्ठ नागरिक व महिलांशी संवाद साधून मतदानाबाबत जनजागृती करताना स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे.

# मतदान करणे म्हणजे संविधानाचा सन्मान राखणे

## डॉ. उद्धव शिंदे यांचे प्रतिपादन; मातोश्री वृद्धाश्रमात 'स्नेहबंध'तर्फे मतदार जनजागृती

नगर – वाईट, भ्रष्ट व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकप्रतिनिधींचा संसदेतला, विधिमंडळातला भरणा रोखायचा असेल तर भारतीय संविधानातून घटनाकारांनी आपल्याला एक भेदक अस्त्र बहाल केलंय ते म्हणजे मतदान! मतदान करणे म्हणजे संविधानाचा सन्मान राखणे होय, असे स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी सांगितले.

विळद येथील मातोश्री वृद्धाश्रमात स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने मतदार जनजागृती करण्यात आली. या वृद्धाश्रमात सुमारे ४५ वृद्ध पुरुष व महिला आहेत. दिलीप चोरडिया या वृद्धाश्रमाचे काम पाहतात. येथील वृद्धांशी डॉ. शिंदे यांनी संवाद साधला. त्यांनी या ज्येष्ठ पुरुष व महिलांना मतदानाबाबत विचारले असता त्यांनी आम्ही मतदानाला जातो, असे सांगितले.

डॉ.उद्धव शिंदे म्हणाले, राष्ट्रहितासाठी मतदान करायचं .., लोकशाहीचा सन्मानासाठी, १०० टक्के करायच मतदान.., असे सांगून वृद्धाश्रमातील नागरिकांना मतदान करण्याबाबत सांगितले. यावर या नागरिकांनी सांगितले की, आम्ही मतदानाला जातोच आणि मतदानही करतो. वृद्धाश्रमात येऊन मतदानाबाबत जागृती केल्याबद्दल व संवाद साधल्याबद्दल डॉ. उद्धव शिंदे यांचे आभार मानले.

# सारडा महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा परितोषिक समारंभ उत्साहात

## आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावर यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान

नगर – पेमराज सारडा महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा पारितोषिक समारंभात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावर विविध स्पर्धांमध्ये चमकलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक होते. यावेळी प्रमुख अतिथी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व अंबरनाथ येथील कॉलेजच्या क्रीडा संचालीका शोभा पालवे व पुण्याच्या सेंट जोसेफ स्कूलच्या क्रीडा शिक्षिका राणी तागड यांच्या हस्ते खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.



आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावर यशस्वी विद्यार्थ्यांचा पेमराज सारडा महाविद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सवात सन्मानप्रसंगी प्रा. शिरीष मोडक, शोभा पालवे, ॲड. अनंत फडणीस, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, प्रा. संजय धोपावकर, सुमतीलाल कोठारी, प्रा. संजय साठे आदी.

यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालिका प्रा. ज्योती कुलकर्णी, रजित श्रीगोड, रवींद्र गुलाटी, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, महाविद्यालयाचे वरिष्ठ क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय धोपावकर व कनिष्ठ क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय साठे, उपप्राचार्य मंगला भोसले, क्रीडा मार्गदर्शक प्रा.साईनाथ थोरात, प्रा.अक्षय कर्डिले आदींसह महाविद्यालयातील विविध क्रीडाप्रकारात यशस्वी झालेले सुमारे ८०० खेळाडू विद्यार्थी, प्राध्यापक व पालक उपस्थित होते.

या समारंभात यावेळी आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये यशस्वी झालेल्या खेळाडूंना शिष्यवृत्ती, राष्ट्रीय स्तरावर विजेत्यांना ब्लेझर, ट्रकसूट, स्पोर्ट्स शूज व मोमेंटो देवून सन्मानित आले.

प्रा.शिरीष मोडक यांनी खेळाडूंचे कौतुक करताना सांगितले की, खेळाडूंनी खूप मेहनत घेवून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये मोठे प्राविण्य मिळवत महाविद्यालयाचे देश व परदेशात नावलौकिक वाढवले आहे. हे सर्व खेळाडू महाविद्यालयाचे भूषण आहेत. हिंद सेवा मंडळ व सारडा महाविद्यालयास सर्वांचा अभिमान आहे. सुयोग वाघ हा लवकरच ग्रँडमास्टर होणार आहे.

ॲड.अनंत फडणीस म्हणाले, सारडा महाविद्यालयातील खेळाडू शिवछत्रपती पुरस्कार, विद्यापीठ पुरस्कारही मिळवला याचा आम्हाला सर्वांना अभिमान आहे. सारडा महाविद्यालयात कायम विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून खेळाडूंना प्रोत्साहन देत आहोत. क्रीडा प्रशिक्षक प्रा. संजय धोपावकर व प्रा. संजय साठे यांनी खूप मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

यावेळी सुमतिलाल कोठारी, अजित बोरा यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले.

महाविद्यालयाचे वरिष्ठ क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय धोपावकर व कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. संजय साठे यांनी महाविद्यालयाचा क्रीडा विभागाचा वार्षिक अहवाल सादर केला.





भाई सथ्था नाईट हायस्कुलमध्ये शिक्षणदूत अभियान प्रारंभ प्रसंगी बोलताना चेअरमन डॉ. पारस कोठारी व उपस्थित रात्रशाळेतील विद्यार्थी. दुसऱ्या छायाचित्रात शिक्षणदूत अभियानात सहभागी झालेले रात्रशाळेचे विद्यार्थी. समवेत शरद पवार, मंगेश भुते, पी. एच. शिंदे, ओमकार भिंगारदिवे, स्वाती होले, विलास बडवे, शुभम पाचारणे आदी.

# दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पंखात बळ निर्माण करण्याचे काम रात्रशाळा करत आहे

## डॉ. पारस कोठारी यांचे प्रतिपादन; भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये शिक्षणदूत अभियानाचा प्रारंभ

नगर – भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये गेल्या ७२ वर्षापासून शिक्षणात खंड झालेल्या, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या शाळाबाह्य, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांनी प्रवेशित होऊन आपला शैक्षणिक स्तर उंचावलेला आहे. अनेक विद्यार्थी रात्र शाळेत शिक्षण घेऊन सक्षमपणे रोजगार करत असून, त्यांनी आपली प्रगती साधली आहे. दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पंखात शिक्षणाने बळ निर्माण करण्याचे काम ही रात्रशाळा करत आहे. आजही अनेक शाळाबाह्य विद्यार्थ्यांना रात्र शाळा ही संकल्पना माहित नाही. अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले जाणार असल्याचे डॉ. पारस कोठारी यांनी सांगितले.

परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडून शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेच्या माध्यमातून पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने हिंद सेवा मंडळ संस्थेच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलने शिक्षणदूत अभियानाचे प्रारंभ करण्यात आले. रात्र शाळेतील विद्यार्थी शिक्षणदूत म्हणून समाजात शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेत आणण्याचे काम करण्याची ही संकल्पना आहे.

या अभियानाचा प्रारंभ रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या उपस्थितीमध्ये झाला. यावेळी प्राचार्य सुनील सुसरे, शिक्षक महादेव राऊत, अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे, बाळू गोरडे, कैलास करांडे, अनिरुध्द देशमुख, अनिरुध्द कुलकर्णी, अविनाश गवळी, कैलास बालटे, महिला शिक्षिका वैशाली दुराफे, वृषाली साताळकर आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

रात्र शाळेतील ५५ विद्यार्थ्यांनी शिक्षणदूत होण्यासाठी पुढाकार घेतला असून, हे विद्यार्थी त्यांच्या भागातील शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेत आणण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत. भाई सथ्था नाईट हायस्कूल मध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इयत्ता आठवी ते बारावी ५०४ विद्यार्थी (विद्यार्थी २६४ व विद्यार्थिनी/महिला २४०) प्रवेशित झाले आहेत. दिवसा अर्थार्जन रात्री ज्ञानार्जन करण्याची संधी शहरातील सर्व गरजवंतांना उपलब्ध होत आहे. सोबतच मासूम संस्थेच्या (मुंबई) वतीने रात्र शाळेत प्रवेशित होऊन शैक्षणिक स्तर उंचावणाऱ्या गरजवंत विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी (शिष्यवृत्ती)आर्थिक मदत देण्यात येते.

आज अखेर मासूम संस्थेच्या वतीने फॅशन डिझायनिंगसाठी १२ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ४८ हजार रुपये) डीएमएलटी साठी ०३ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ५४ हजार रुपये) ब्युटी पार्लर साठी ०२ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ४५ हजार रुपये) या व्यतिरिक्त इतर व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी (शिष्यवृत्तीस) आर्थिक मदतीस पात्र झालेले असल्याची माहिती प्राचार्य सुनील सुसरे यांनी दिली.

भाई सथ्था नाईट हायस्कूल मध्ये शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण देखील दिले जात असून, यासाठी जन शिक्षण संस्था, सिद्धी प्यारा मेडिकल, इंडियन अकॅडमी ऑफ फॅशन डिझायनिंग, ट्राय लॉजिक सॉफ्ट सोल्युशन, ऐ.पी. प्रा.लि. (एमआयडीसी), ग्लोबल रिच स्किल ट्रेनिंग इंडिया प्रा.लि हे रात्र शाळेशी जोडल्या गेल्या आहेत.

शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य करणारे शरद पवार, मंगेश भुते, पी.एच. शिंदे, ए.सी. ओमकार भिंगारदिवे, महिला शिक्षिका स्वाती होले, विद्यार्थी शुभम पाचरणे यांना डॉ. कोठारी व शालेय समितीचे सदस्य विलास बडवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. एस. शिंदे व श्री. गाडगीळ यांनी केले. या उपक्रमास शिक्षण विभाग व संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष अनंत फडणीस, मानद सचिव संजय जोशी, जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा व सर्व संचालक मंडळाने शुभेच्छा दिल्या.

# डॉ. कमर सुरूर यांना बज्मे उर्दू बैंगलोरतर्फे मलिका-ए- सुखन पुरस्काराने सन्मानित



डॉ. कमर सुरुर यांनी बज्मे उर्दू बैंगलोरतर्फे मलिका-ए-सुखन पुरस्कार अध्यक्ष अकरमुल्ला अक्रम, गुफरान अहमद यांच्या हस्ते स्वीकारला.

नगर – शहरातील उर्दू साहित्याला पोषक वातावरण निर्मिती साठी गेली अनेक वर्षे सदैव तत्पर असलेल्या डॉ. कमर सुरुर उर्दू भाषेचा विकास व्हावा यासाठी सतत प्रयत्नशील असतात. लोकांमध्ये उर्दू भाषेची आवड निर्माण झाली पाहिजे. आणि उर्दू भाषेचा प्रचार आणि विकास व्हावा यासाठी नेहमी कार्यरत असतात, असे प्रतिपादन बंगलोरच्या बज्म-उर्दू साहित्य संस्थेचे सचिव गुफरान अमजद यांनी व्यक्त केले. डॉ. कमर सुरुर यांच्या सेवेची दखल घेऊन त्यांना बज्मे उर्दू बैंगलौर तर्फे २०२४ सालचा साहित्य पुरस्कार मलिका-ए- सुखन देऊन गौरविण्यात आले.

त्यानिमित्ताने बज्मे उर्दू बैंगलोर यांच्यातर्फे अखिल भारतीय मुशायरा आयोजित करण्यात आला होता. अलाह बख्श आमरी यांच्या अध्यक्षतेखाली मुशायरा झाली. यावेळी प्रमुख पाहुणे अल्हाज बाबाजी, मोहंमद खुर्शीद अक्रम कामली व सय्यद सलीमुद्दीन आदी उपस्थित होते.पाहुणे कवी आरिफ जमान आरिफ, तज्ञमुल हुसेन जाहिद, नाज पुरवाई साहिबा, अलका शरर, रेशमां तलत, तसेच यजमान कवींनी उत्तम शब्दांचे पठण करुन शायरी सादर केली. श्रोत्यांनीही त्यांना भरभरून दाद दिली.

बज्मे उर्दूचे अध्यक्ष अकरमुल्ला अक्रम, सचिव गुफरान अमजद, बज्मे उर्दूचे सदस्य आणि बैंगलोरच्या प्रेक्षकांचे डॉ. कमर सुरुर यांनी मलिका-ए-सुखन पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल आभार मानले.

# श्री सत्यसाई सेवा समितीतर्फे ६ मे रोजी नगरमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



नगर – श्री सत्यसाई सेवा समिती अहमदनगर शाखेच्या बालविकास विभागातर्फे ६ मे रोजी सायं. ५ वा. माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन, सावेडी रोड, अहमदनगर येथे भगवान बाबांच्या मातोश्री ईश्वरम्मा यांच्या पुण्यस्मरणानिमित्त श्री सत्यसाई बालविकास वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींचा विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामुल्य असून, जास्तीत जास्त आपल्या पाल्यांसह उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजक अशोक कुरापाटी यांनी केले.

# होमिओपॅथीक कॉलेजतर्फे ६ ते ११ मे दरम्यान पोट विकारावर शिबीर

नगर – अहमदनगर होमिओपॅथीक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सावेडी रोड, नगर येथे ६ ते ११ मे दरम्यान सकाळी ९.३० ते ५.०० या वेळेत पोटांचे विकार या विकारावर मोफत तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन केले असल्याची माहिती प्राचार्य व रुग्णालयीन अधिक्षक डॉ. सुनिल पवार यांनी दिली. या शिबीरामध्ये पोटांचे विविध विकार या आजारावर सखोल चिकित्सा करुन आजार बरा होईपर्यंत दर आठ दिवसाला मोफत होमिओपॅथिक औषधे दिली जातील.

सर्व रुग्णांची मोफत तपासणी व उपचार डॉ. सुनिल पवार, डॉ. सौ. कल्पना ठुबे, डॉ. वैशाली काकडे, डॉ. माधुरी मोरे हे करणार असुन आजार बरा होईपर्यत सर्वांना मोफत होमिओपॅथीक औषधे देण्यात येतील. तसेच गरजेनुसार ईसीजी, रक्त, लघवी व सोनोग्राफी व एक्सरेची तपासणी करुन, या तपासण्यांवर ३० टक्के सवलत दिली जाईल.याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भुषण अनभुले, उपाध्यक्ष भुषण चंगेडे, खजिनदार डॉ. विलास बी सोनवणे, सचिव डॉ. डी. एस. पवार, सहसचिव लक्ष्मीनिवास सारडा, संचालक बोरा आर.एस, अभय मुथ्था, कृष्णा क्षत्रिय, के. शिवाजी रणसिंग, डॉ. समीर होळकर, राजेंद्र मेहेत्रे, डॉ. ऋतुजा चव्हाण तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार व आर एम ओ. डॉ. मोरे माधुरी यांनी केले आहे.

# आनंदी जीवनासाठी ५ मे रोजी नगरमध्ये 'प्रेरणादायी मार्गदर्शन'

नगर – यशाचा उत्तम मार्ग म्हणजे पुन्हा एकदा प्रयत्न करणे होय, यासाठी आपण नेहमी प्रयत्नशील असतो, आपल्या जीवनात अनेक ध्येय असतात, ते डोळ्यासमोर ठेवून आपल्या सुखी आयुष्याची अनेक स्वप्न पाहत असतो, यासाठी तुमच्या जीवनात सुखी व समृद्ध करण्यासाठी मार्गदर्शकाची खूप गरज असते. तुम्ही युवक असाल तर आपले यशस्वी जीवनासाठी अनेक प्लॅनिंग नियोजन करीत असतो, कौटुंबिक जीवनात आनंदी आहात, तसेच यशस्वी उद्योजक आहात, ही गोष्ट आपल्या आयुष्यासाठी खूप महत्त्वाचे आहे त्यासाठी तुम्हाला प्रेरणा देण्याची गरज आहे. कारण जर तुम्हाला आयुष्यात पुढे जाण्यासाठी प्रेरणा मिळाली नाही तर तुम्ही निराश होता जीवन संघर्षमय वाटायला लागते. निराश न होण्यासाठी कायम प्रेरणा मिळणे आपल्याला आवश्यक आहे. तर जाणून घ्या आपल्या जीवनात सुखी राहण्याचे रहस्य सूत्रे.

याच उद्देशाने ५ मे रोजी सायंकाळी ७ वाजता अहमदनगर येथील पाईपलाईन रोड, गावडे मळा, ध्यान केंद्र हॉलमध्ये आनंदी जीवनासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे. यामध्ये मार्गदर्शन आंतरराष्ट्रीय युवा ट्रेनर, बिजनेस कोच पार्टनर, स्पिरीच्युअल आणि लाइफ कोच पार्टनर असे अनेक यशस्वी सेमिनार करणारे सलील पुळेकर करणार आहेत. यांचे देशभरात नव्हे तर विदेशामध्ये देखील आयोजित झालेले आहेत.

प्रेरणादायी मार्गदर्शनासाठी (मोटिवेशनल स्पीच) शिबिरामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन कृष्णा पेंडम यांनी केले आहे. नाव नोंदणी आवश्यक आहे. माहितीसाठी ९४२२२२०८७४.

## निवडणूक कर्तव्यावर असलेल्या मतदारांसाठी मतदार सुलभता केंद्रांची स्थापना

नगर – भारत निवडणूक आयोगाने मतदानाच्या दिवशी निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असलेल्या मतदारांना मतदान करण्यासाठी प्रशिक्षणाच्या ठिकाणी मतदार सुलभता केंद्र स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार ३७ अहमदनगर लोकसभा मतदार संघातील २२२-शेवगाव, २२३-राहुरी, २२४-पारनेर २२५-अहमदनगर शहर, २२६-श्रीगोंदा व २२७-कर्जत-जामखेड या सहा विधानसभा मतदार संघात मतदार सुलभता केंद्रांची व्यवस्था प्रशिक्षणाच्या ठिकाणी करण्यात येत आहे. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या मतदारांनी त्यांच्या प्रशिक्षणाच्या दिवशी टपाली मतपत्रिकेद्वारे मतदानाचा हक्क मतदार सुलभता केंद्रावर जाऊन बजवावा, असे आवाहन अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केले आहे.

# आनंद देता येत नसल्यास कोणालाही दुःख देवू नये



डॉ. सुनिल लुले

नगर – आनंद देता येत नसल्यास कोणालाही दुःख देवू नये. आपल्याकडून कोणीही दुखावले जाणार नाही याची काळजी घेणारेच परमार्थाच्या मार्गावर वाटचाल करू शकतात, असे वेदांताचे अभ्यासक आचार्य श्रीगुरू डॉ.सुनिल लुले यांनी परखडपणे सांगितले.

श्रीमद् आद्य शंकराचार्य जयंतीनिमित्त येथील ग्रंथराज दासबोध वाचन निरूपण मंडळाच्यावतीने रासनेनगरमधील श्रीदुर्गामाता मंदिराच्या सभागृहात आयोजित केलेल्या प्रवचनमालेत व्दितीय पुष्प गुंफताना ते बोलत होते. एस.एम.कुलकर्णी यांनी स्वागत केले. अविनाश धर्माधिकारी आणि नाना देवकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. इंजि. एन.डी.कुलकर्णी यांच्या हस्ते प्रवचनकार डॉ.लुले यांना शाल व पुष्पहार घालून गौरविण्यात आले. विठ्ठलराव बागडे यांनी मधुर स्वरात गुरूस्तवन गायिले.

आचार्य श्रीगुरू डॉ.सुनिल लुले पुढे म्हणाले, उमेदवारीसाठी पक्ष बदलणारे राजकारणी मतलबीच असतात. पक्ष केव्हाही बदलता येत असल्याने उमेदवारी मिळाली नाही तर लगेच पक्ष बदलला जातो तो स्वतःचा मतलब म्हणूनच! राजकीय पक्ष बदलणाऱ्यांसारखे आपण वागावे की भगवंताच्या पक्षात रहावे, हे आपणच ठरवायचे असते. प्रापंचिकांची बुध्दी जड-स्थूल असते. तिला हे सहज कळत नाही. श्रीसमर्थ रामदास स्वामींनी विषय सुख शाश्वत आनंद देणारे नाही हे दासबोध ग्रंथामध्ये समजावून सांगितले असले तरी विषय सुखामागे धावणाऱ्यांची पळापळ आपण पहातोच. प्रापंचिक गोष्टीत रमणे-रेंगाळणे उपयोगाचे नसते.

आपणास कित्येक गोष्टी पटत नाहीत. पचत नाहीत. अंगवळणी पडत नाहीत. वर्षानुवर्षे परमार्थाविषयी ऐकून आत्मानंदात त्याचे रूपांतर होत नाही. केवळ बुध्दीने परमार्थ होत नाही. बुध्दीने जाणून घेऊन बुध्दी समर्पित करत शरण जावे लागते. भगवान श्रीकृष्ण गीतेच्या माध्यमातून आपणास जातीय राजकारण नव्हे जातीय परमार्थ सांगतात. नित्यजात म्हणजे आत्मा. आत्मा अविनाशी आहे. कधीही मरत नाही. अनित्य जात म्हणजे शरिर होय. आपली एकाग्रता भंग होता कामा नये इतके एकाग्र होता आले पाहिजे.

भगवान श्रीकृष्ण, भगवान श्रीराम, भगवान श्रीदत्तात्रेय यांचा जन्मोत्सव आपण साजरा करताना त्यांनी जन्म घेतला नाही तर ते प्रगट झाले हे वास्तव लक्षात घेतले पाहिजे. त्यांचे प्रागट्य कोणी पाहिले नाही आणि जाणेही कोणी पाहिलेले नाही. श्रीरामांनी शरयू नदीत देह समर्पण केला. तो देह कोणालाही पुन्हा दिसला नाही! भगवान श्रीकृष्ण जाताना त्यांच्या देहाच्या जागी केवळ फुले दिसली! तिरोधान म्हणजे जाणे. त्यांना जन्म नाही. मरण नाही. त्यांचा देह चैतन्यरूप असतो म्हणून तो म्हाताराही होत नाही. म्हणूनच देवांचे म्हातारे झालेले फोटो कोठेही दिसत नाहीत. आपणही स्वानंदघन आनंदरूप आहोत, हेच विसरतो आणि दुःख उगाळत शोक करत बसतो.

तत्वज्ञान दुसऱ्याला शिकवण्यासाठी नसते तर स्वतःला जगण्यासाठी असते. जीवनात घेतलेल्या अनुभवाचे प्रतीक चेहऱ्यावरील सुरकुत्या असतात. ज्याला जीवन अखंड आनंदात घालवता येते तोच खरा पराक्रमी होय. परमार्थात पुरूषार्थाने यश येते. आपल्याला शोक मुक्त शोक रहित रहाता आले की, आनंद आपल्या पुढ्यात येतो. वसंतऋतुचा बहार सृष्टीमध्ये सर्वत्र आनंद निर्माण करतो. आपल्या ह्रदयात वसंत फुलावा याकरिता आपल्यातील अहंकार नामशेष करावा, असे आवाहन आचार्य श्रीगुरू डॉ.सुनिल लुले यांनी केले. वेदांत तत्वज्ञान आणि गीतेमधील संदेश आजही आपल्यास मार्गदर्शन करते हे विविध उदाहरणे देत सोप्या शब्दांत सांगितल्याने श्रोत्यांना प्रवचन चांगलेच भावले. शहराच्या विविध भागांमधील जिज्ञासू स्त्री-पुरूष भाविक श्रवणानंद घेण्यास उपस्थित होते. सनातन संस्थेच्या सात्विक उत्पादनांचा आणि अभ्यासपूर्ण ग्रंथाचा स्टॉल भाविकांचे विशेष आकर्षण ठरला.









# मुलांचे भावविश्व उलगडणारा कविता संग्रह : आनंदाने गाऊया




महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी डॉ. सुदर्शन धस हे एक संवेदनशील कवी आहेत. गेली अनेक वर्ष त्यांच्या बालकविता विविध वृत्तपत्रे, मासिके व दर्जेदार दिवाळी अंकातून सातत्याने प्रकाशित होत आहेत. भावशलाका या आपल्या काव्यसंग्रहानंतर तब्बल दहा वर्षांनी आनंदाने गाऊया हा आपला बालकविता संग्रह घेऊन ते वाचकांच्या भेटीला आले आहेत.

डॉ. सुदर्शन धस हे शिक्षक असून रयत शिक्षण संस्थेमध्ये गेली २७ वर्षापासून अध्यापक म्हणून काम करतात. इंग्रजी व मराठी विषयात एम.ए. असणारे तसेच अनेक वर्ष इंग्रजी व मराठीचे अध्यापन करणारे मराठी विषयात सेट, नेट व पीएच.डी प्राप्त धस सरांचा मराठी विषय लेखनात हातखंडा आहे. त्यांच्या बालकविता बालमनाचा ठाव घेणाऱ्या आहेत. बालवाचकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने त्यांच्यासाठी आनंदाने गाऊया हा बालकविता संग्रह त्यांनी आवर्जून तयार केला आहे.

आनंदाने गाऊया या काव्यसंग्रहात एकूण ४७ कविता आहेत. मामाचे गाव, वाघाची दिवाळी, जादूगार ससोबा असे हलकेफुलके विषय घेऊन या कविता तयार केल्या आहेत.

मामाचे गाव या कवितेत कवी म्हणतो, मामाच्या गावाला

*आहेत भरपूर आंबे*
*सुट्टीत गाडी आमची*
*घेत नाही थांबे*
*मामा भेटून आम्हाला*
*होतो जाम खुश*
*शेतामधून फिरवताना*
*खा म्हणतो ताजा ऊस*

कवीने सुट्टीच्या दिवसातील मामाच्या गावचे सुंदर वर्णन या कवितेत केले आहे. काव्यसंग्रहातील माझे आजोबा या कवितेतून आजोबांचे महत्त्व विशद होते. याशिवाय पाऊस येतो. ग्रंथ महिमा, चिमणराव फॉरेस्टर, रोबोट, खेळाची बाग, चला आयुष्य फुलवूया, आमच्या नव्या बाई या कविता देखील मुलांना वेगळ्या विश्वात फिरवून आणतात.

*मोनूच्या सायकलची*
*बातच न्यारी,*
*जादूचे पंख तिला*
*रूप तिचे भारी.*
*सायकलवर मोनू गेली*
*पऱ्यांच्या देशात*
*स्वागत तिचे झाले तिथे*
*अगदी भारी जोशात*

असे अद्‌भूत रम्य वर्णन मोनूची सायकल या कवितेतून येते. या काव्यसंग्रहातील परीचे पप्पा या कवितेचे बालगीतामध्ये रूपांतर झालेले असून , धस सरांची ही कविता नुकतीच गुजरातमधील अहमदाबाद शहरात स्वरबद्ध झालेली आहे. याशिवाय पोस्टमन, बैलपोळा, प्रेरणा, चांदोबा झाला राजा, परीक्षेचे दिवस, माझी प्रिय शाळा, दिवाळी सैनिकाची, असे जगावे, आली अंगणी दिवाळी, आदर्श विद्यार्थी, ज्ञान विज्ञानाचे युग, या कविता मुलांना आवडतील अशाच आहेत. पाखरांची दुनिया साकारताना पाखरांची दुनिया या कवितेत कवी म्हणतात ...

*चिव चिव करीत*
*चिऊताई येते ,*
*श्रावण सरीत*
*ओलीचिंब नहाते.*
*काव काव करीत*
*कावळे दादा येतो,*
*विजेच्या तारेवर*
*बसू नका म्हणतो.*

लहान मुलांमध्ये कवी एकजीव होऊन जातो. बाल वाचकांसाठी लिहिलेल्या या कविता मोठ्यांच्याही अगदी सहज ओठी येतात व त्यांना त्या गुणगुणण्याची प्रेरणा मिळते, हे या काव्यसंग्रहाचे खरे वैशिष्ट्य आहे.

चला वृक्ष लावूया या कवितेत कवी म्हणतो,

*वृक्ष लावूया वृक्ष जगवूया*
*मोल तयांचे आहे महान*
*वृक्षांविना ही धरती होईल*
*वाळवंटी जणू रान*
*प्रदूषणाची आज समस्या*
*एकच आहे त्याचे उत्तर*
*वृक्ष लावूया वृक्ष जगवूया*
*चला चला हो लगेच सत्वर*

चला वृक्ष लावूया या कवितेत कवी झाडांचे महत्त्व सांगून वृक्ष लावण्याचा संदेश बालवाचकांना देतो. मनोरंजना बरोबरच सामाजिक जाणीव छोट्या बाल दोस्तांमध्ये विकसित करण्यासाठी कवीने आपल्या कवितेतून प्रयत्न केले आहेत.

अहमदनगर येथील ऋतू प्रकाशन, यांनी या पुस्तकाची साजेशी बांधणी केली आहे. पुस्तकाची गुणवत्ता आणि पानांचा दर्जा त्यांनी केलेल्या मेहनतीची साक्ष देतो. प्रसिद्ध चित्रकार माननीय श्री. संतोष कदम, यांनी विषयाला अनुरूप काढलेले आकर्षक मुखपृष्ठ पुस्तकाच्या उंचीत मोलाची भर टाकते. तर आतील चित्रे प्रत्येक प्रसंगाला अनुरूप देऊन त्यांनी पुस्तकाची शोभा अधिकच वाढवली आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध बालसाहित्यिक व साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार विजेते कवी एकनाथ आव्हाड यांनी या पुस्तकाची पाठराखण केली आहे. कवी डॉ. सुदर्शन चंद्रशेखर धस यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा..!

शब्दांकन –
**सचिन बेंडभर पाटील**
कार्यकारणी सदस्य, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे.










# स्तनाच्या कर्करोगामुळे...

स्तनाचा कर्करोग हा आता कर्करोगाचा सर्वात सामान्य प्रकार आहे. आता तरुणींमध्येही स्तनाचा कर्करोग दिसून येत आहे. तीस आणि चाळीशीच्या महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे निदान वाढत असल्याते निर्दशनास आले आहे. अनुवांशिकता, जीवनशैली आणि पर्यावरणीय घटकदेखील यामागे कारणे असू शकतात. या आजारामुळे २०४० पर्यंत दरवर्षी एक लाखांहून महिलांचा मृत्यू होण्याची शक्यता आहे. 'लॅन्सेट'च्या नव्या अहवालातून ही बाबसमोर आली आहे. अहवालात म्हटले, की २०२३ च्या अखेरीस सुमारे ७८ लाख महिलांना स्तनाच्या कर्करोगाचे निदान झाले आणि त्या वर्षी सुमारे सहा लाख ८५ हजार महिलांचा या आजाराने मृत्यू झाला. खेरीज या आजारावरील उपचारही अत्यंत महाग असल्यामुळे सर्व स्तरातील महिलांना वेळेत आणि योग्य ती मदत मिळत नाही. विशेषत: अविकसित भागांमधील वा काही विकसनशील देशांमध्येही ही स्थिती पहायला मिळते.



जागतिक स्तरावरील अंदाजानुसार स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण २०२० मध्ये २.३ दशलक्ष वरून २०४० पर्यंत तीन दशलक्षांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे, ज्याचा परिणाम कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांवर होईल. २०४० पर्यंत, दरवर्षी एक दशलक्ष लोकांचा मृत्यू होण्याची शक्यता आहे, असा इशारा 'लॅन्सेट' अहवालात दिला असून स्तनाच्या कर्करोगामुळे उद्भवणारी तीव्र असमानता

**आरोग्यचर्चा**

आणि लक्षणे, नैराश्य आणि आर्थिक भार याकडे लक्ष वेधले आहे. दरम्यान स्तनाच्या कर्करोगामध्ये अशी काही लक्षणे आहेत जी स्तनामध्ये गाठ निर्माण होण्यापूर्वी दिसतात. 'ओहायो स्टेट युनिव्हर्सिटी कॉम्प्रिहेन्सिव्ह कॅन्सर सेंटर'ने केलेल्या अभ्यासात एक हजाराहून अधिक लोकांचे सर्वेक्षण केले गेले आणि ९३ टक्के लोकांना स्तनाच्या कर्करोगाचे लक्षण म्हणून गाठ असल्याचे आढळले. सर्वेक्षण केलेल्यांपैकी निम्म्या व्यक्तींमध्ये थकव्याव्यतिरिक्त सामान्य लक्षणे आढळून आली. स्तनाच्या कर्करोगाची सुरुवात केवळ स्तनामध्ये गाठ निर्माण होण्याने होत नाही. स्तनाग्र (निप्पल) मागच्या बाजूने दबलेली, उलटे किंवा खालच्या दिशेने वळल्यास हा धोका लक्षात घ्यावा. स्तन आकुंचन होणे, स्तनाच्या भागामध्ये संवेदना कमी होणे, स्तनाची त्वचा मंद होणे, जाड होणे, स्तनाग्रा (निपल) मधून स्त्राव होणे आदी स्तनाच्या कर्करोगाची लक्षणे आहेत. जगभरात गेल्या पाच वर्षांत स्तनाच्या कर्करोगाच्या रुग्णांची संख्या प्रचंड वाढते आहे.

# जास्त झोप हे आजाराचे लक्षण

**रात्रभर झोपूनही दिवसा झोपावे वाटते. कितीही तास झोपले, तरी झोप कधीच पूर्ण होत नाही. सतत झोपणारी ही व्यक्ती आळशी आहे, असे तुम्हाला वाटते का? सत्य हे आहे की हा आळस नसून एक दुर्मीळ झोपेचा विकार आहे. ही एक गंभीर आरोग्य स्थिती आहे.**



अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलिना येथील २६ वर्षीय मॉडेल ॲलिसा डेव्हिस हिलाही असाच झोपेचा विकार होता. ती १२ ते १४ तास झोपायची; पण तिचा आळस काही जात नव्हता. याबाबत डॉक्टरांचा सल्ला घेतला असता डॉक्टरांनी तिला जास्त पाणी आणि कॉफी पिण्याचा सल्ला दिला; पण तरीही झोप काही गेली नाही. सर्वांनी तिला आळशी मानले आणि ती स्वत:ला ही तशीच समजू लागली. परिस्थिती अत्यंत गंभीर झाल्यावर न्यूरोलॉजी तज्ज्ञ आणि झोप तज्ज्ञ डॉक्टरांनी तिची तपासणी केली. तिच्या स्थितीचे कारण इडिओपॅथिक हायपरसोमनिया नावाचा

**आरोग्यचर्चा**

आजार असल्याचे आढळून आले. हा एक दुर्मीळ झोपेचा विकार आहे.

हा एक दुर्मीळ झोपेचा विकार आहे. यामध्ये सतत थकवा जाणवतो आणि रात्रभर झोप झाल्यानंतर तुम्ही जेव्हा उठता तेव्हा तुम्हाला पुन्हा झोपल्यासारखे वाटते. 'हायपरसोमनिया'ने ग्रस्त व्यक्ती इतक्या लवकर झोपी जाते की तिला त्याच क्षणी काही मिनिटे ते काही तास झोपावे लागते. या झोपेमागील कारण झोपेची कमतरता किंवा मानसिक आरोग्याची कोणतीही स्थिती नाही. साधारणपणे, पौगंडावस्थेच्या शेवटच्या वर्षांत किंवा प्रौढत्वाच्या सुरुवातीच्या वर्षांत ही समस्या उद्भवू शकते. लोक जास्त झोपेचा संबंध आळशीपणाशी जोडतात आणि आरोग्याची स्थिती म्हणून न पाहता, हे ओळखण्यासाठी कित्येक आठवडे किंवा महिने लागतात.

या आजाराने ग्रस्त लोकांची नेमकी संख्या निश्चित करणे कठीण असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. 'नॅशनल स्लीप फाऊंडेशन'नुसार, दर दहा लाख लोकांपैकी २० ते ५० लोक या झोपेच्या विकाराने ग्रस्त आहेत. दिल्लीचे वरिष्ठ फिजिशियन डॉ. बॉबी दिवाण यांच्या मते, या झोपेचा विकार समजून घेण्यासाठी आणि त्यावर उपचार करण्यासाठी वैद्यकीय शास्त्राला अजूनही खूप संशोधन करावे लागेल.

'इडिओपॅथिक हायपरसोमनिया'चे त्याचे सर्वात सामान्य लक्षण म्हणजे दिवसा जास्त झोप येणे. ही झोप इतकी जोरदार येते की माणसाला झोप घेतल्याशिवाय राहणे जवळजवळ अशक्य होते. एखाद्या व्यक्तीने डुलकी घेतली तर ती काही मिनिटांऐवजी काही तास टिकते. बहुतेक रुग्णांची अशी तक्रार असते की, झोप घेतल्यानंतरही त्यांना ताजेतवाने वाटत नाही आणि सतत थकवा आणि आळस येतो. या स्लीप डिसऑर्डरने ग्रस्त असणारे लोक २४ तासांत १२ ते १४ तास झोपतात. 'स्लीप फाउंडेशन'च्या मते, 'इडिओपॅथिक हायपरसोमनिया'ने ग्रस्त असलेल्या ३५ ते ७० टक्के लोकांना स्लीप इनर्शियाचा अनुभव येतो. स्लीप इनर्शियात जागे झाल्यानंतरही व्यक्तीला चिंताग्रस्त आणि गोंधळलेले वाटते. याशिवाय या आजाराने ग्रस्त असलेल्यांना इतरही काही लक्षणे दिसू शकतात. 'स्लीप डिसऑर्डर'मागील नेमकी कारणे अद्याप कळू शकलेली नाहीत; परंतु अभ्यासात खालीलपैकी काही कारणे समोर आली आहेत. 'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'मध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासानुसार, 'इडिओपॅथिक हायपरसोमनिया'ने ग्रस्त असलेल्या पन्नास टक्क्यांहून अधिक लोकांना त्यांच्या कौटुंबिक इतिहासात झोपेचा विकार किंवा तत्सम मध्यवर्ती विकार आहे. यामागे जेनेटिक्स हे सर्वात मोठे कारण असल्याचा निष्कर्षही समोर आला आहे.

# इअरफोन वापरताय? सावधान!

मोबाईलवर सतत बोलण्यासाठी, गाणी ऐकण्यासाठी, चित्रपट पाहण्यासाठी किंवा वेबसिरीज पाहण्यासाठी आपण सतत ब्लू टूथचा वापर करतोच. आजच्या युगात ब्लूटूथ इअरफोन आणि इअरबडचा वापर सर्रास केला जातो. अनेकजण ऑफिसमध्ये किंवा प्रवासात असताना दिवसभर ब्लूटूथ इअरफोन वापरतात; पण ब्लूटूथ इअरफोनचा अतिवापर केल्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात.

ब्लू-टूथ इअरफोन, हेडफोन, इअरबड्सच्या माध्यमातून गाणी ऐकण्याची फॅशन वाढत आहे. तसेच दोन्ही हात मोकळे राहत असल्याने त्यांचा उपयोग फक्त हाक मारण्यासाठी व बोलण्यासाठी केला जातो. ब्लू टूथ वायरलेसचा हा वापर कनेक्टिव्हिटी या सुविधेचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. दोन डिव्हाईसमध्ये जोडणीसाठी याचा वापर जास्त प्रमाणात होतो. स्मार्टफोन, टीव्ही, होम थिएटर हेडफोन यांसह अनेक उपकरणांसाठी ब्लू टूथचा वापर केला जाऊ शकतो; मात्र याच ब्लू टूथमुळे मोबाईलच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक लहरी एकाग्र होतात आणि परिणामी कानाचा त्रास, डोकेदुखी, रक्तदाब वाढणे, स्टॅमिना कमी होणे असे दुष्परिणाम दिसून येतात, असा निष्कर्ष तज्ज्ञ डॉक्टरांनी काढला आहे.

**आरोग्य जागृती**




जगात कुठेही असो पण अनेकांकडे वायरलेस इअरफोन असतात; परंतु वायरलेस इअरफोनमधून उत्सर्जित होणारी रेडिओ फ्रिक्वेन्सी रेडिएशन आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक असतात. 'युनिव्हर्सिटी ऑफ कोलोरॅडो'च्या जेरी फिलिप्स यांनी या विषयावर संशोधन केले असून त्यामधून धक्कादायक माहिती समोर आली. दीर्घकाळ गाणी ऐकल्याने स्मरणशक्ती कमी होण्याची भीती असते. वायरलेस हेडफोन्स, इअरफोन्स, इअरबड्स आदींचा जास्त काळ वापर केल्यास त्यामधून बाहेर पडणारी रेडिओ फ्रिक्वेन्सी रेडिएशन्स आणि इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन्स आरोग्याला हानी पोहोचवू शकतात.



# साखरेचं सेवन; मधुमेहाला कारण

मधुमेह आणि साखरेचा जवळचा संबंध आहे. मधुमेहाला अनेक बाबी कारणीभूत असतात. त्यामुळे सर्वांगिण आहार, जीवनशैली, जनुकं याबरोबर मधुमेहाबाबतीतली साखरेची भूमिका माहीत असायला हवी. रक्तातलं साखरेचं प्रमाण नियंत्रित करण्यात शरीर असमर्थ ठरू लागलं की मधुमेहाचं निदान होतं. स्वादुपिंडातून पुरेशा प्रमाणात इन्शुलिनची निर्मिती होत नसेल तर किंवा शरीरातल्या पेशी इन्शुलिनचा प्रतिकार करू लागल्या तर मधुमेह जडतो. यापैकी एक किंवा दोन्ही कारणं मधुमेहाला कारणीभूत ठरू शकतात. रक्तातल्या साखरेच्या अतिप्रमाणामुळे हृदयविकार, किडनी निकामी होणं असे धोके वाढतात. टाईप वन आणि टाईप २ असे मधुमेहाचे दोन प्रकार आहेत. टाईप १ मधुमेह अत्यंत दुर्मीळ आहे. या मधुमेहाचा संबंध जनुकांशी असतो तसंच मधुमेहाच्या एकूण रूग्णांपैकी ५ ते १० टक्के रूग्णांना टाईप १ मधुमेह असतो. उर्वरित टाईप २ मधुमेहाचे रूग्ण असतात.




साखर म्हणजे सुक्रोज. ही साखर ऊसापासून बनवली जाते. ग्लुकोज आणि फ्रुक्टोजच्या एकत्रिकरणातून सुक्रोज बनतं. आपण सुक्रोज खातो तेव्हा रक्तपेशींमध्ये शोषलं जाण्याआधी लहान आतड्यातल्या काही घटकांमुळे ग्लुकोज आणि फ्रुक्टोज हे घटक वेगळे होतात. यामुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण वाढतं आणि स्वादुपिंडाला इन्शुलिनची निर्मिती करण्याचा संदेश मिळतो. इन्शुलिनमुळे ग्लुकोज रक्तातून बाहेर पडतं आणि त्याचा वापर ऊर्जेसाठी होतो. दरम्यान, पेशींकडून थोड्या प्रमाणात फ्रुक्टोजही शोषलं जातं आणि ऊर्जेसाठी वापरलं जातं. उर्वरित फ्रुक्टोज यकृतात शोषलं जाऊन त्याचं रूपांतर ग्लुकोजमध्ये किंवा चरबीत होतं. ही चरबी शरीरात साठून राहते तर ग्लुकोजचा वापर ऊर्जेसाठी केला जातो. फ्रुक्टोजचं रूपांतर चरबीत होत असल्याने त्याचं अतिप्रमाण ट्रायग्लिसराइड्सचं प्रमाण वाढवू शकतं. यामुळे हृदयविकार तसंच फॅटी लिव्हरचा धोका वाढतो. शरीरात ऊर्जा निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या साखरेपेक्षा अधिक साखर खाल्ली तर त्याचं रूपांतर फॅटी ॲसिड्समध्ये होतं आणि ती चरबी म्हणून साठवली जाते.

**आरोग्यभान**

साखरेच्या अतिसेवनामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. नियमितपणे गोड पेयांचं सेवन करणाऱ्या लोकांमध्ये मधुमेहाचा धोका २५ टक्क्यांनी वाढतो. दिवसभरात एखादं गोड पेय प्यायलं तरी मधुमेहाचा धोका १३ टक्क्यांनी वाढू शकतो. साखरेचं सेवन हे मधुमेहाचं कारण नसलं तरी त्याचा या विकाराशी खूप जवळचा संबंध असल्याचं उघड झालं आहे.

# हे उपाय येतील कामी

माझ्या चौदा वर्षांच्या मुलीला उजव्या कानाजवळ डोक्याला दुखापत झाली होती. प्राथमिक उपचारांनंतर ती बरी झाली. पण नंतर तिला चेहऱ्याच्या उजव्या बाजूला फेशियल पाल्सी झाला. यावर काय उपचार करता येतील?




उत्तर: फेशियल पाल्सी नुकताच झाला असल्याने औषधोपचार, व्यायाम आणि प्रतिबंधात्मक उपायांनी तुमची मुलगी बरी होऊ शकते. चेहऱ्याची उजवी बाजू थंड गोष्टींच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यायला हवी. उजव्या बाजूनी चुईंगम चघळणं उपयुक्त ठरू शकेल. गाल फुगवण्याचा व्यायाम केल्याने ओठ आणि गाल आधीच्या स्थितीत येतील.

**विचारा प्रश्न**

उजव्या बाजूच्या ओठांच्या कोपऱ्यापासून कानांपर्यंत नियमित मसाज करायला हवा. दिवसातून दोन ते तीन वेळा केलेला मसाज उपयुक्त ठरू शकतो. बहुसंख्य रूग्ण यातून पूर्णपणे बरे होतात. तरूण मुलं जलद गतीने बरी होतात.

# स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरविषयी...

मध्यंतरी काही कलाकारांना कॅन्सरचं निदान झालं. यामुळे बॉलिवूडसह त्यांचे चाहतेही चांगलेच हादरले. अर्थात त्यांच्या तब्येती चांगल्या असून ते उपचारांना प्रतिसाद देत असल्याच्या बातमीमुळे चाहत्यांना दिलासा मिळाला. या धक्क्यातून बॉलिवूड आत्ता कुठे सावरले खरे पण अशा बातम्या आता काही नव्या राहिलेल्या नाहीत. कॅन्सर हा दुर्धर आजार असल्याचं आपण जाणतो. रूग्णाच्या शरीरावर आणि मनावर या विकाराचे वाईट परिणाम होतात. पण उपचारांनी स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर बरा होतो. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर म्हणजे नेमकं काय याविषयी...




कॅन्सरचे विविध टप्पे असतात. कॅन्सर शरीरात किती खोलवर पसरला आहे यावरून त्याचा टप्पा ठरवला जातो. कॅन्सरच्या पेशींच्या वाढीची गती तसंच त्याचे धोके जाणून घेण्यासाठीही या टप्प्यांची मदत होते. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर हा स्तनांच्या कॅन्सरचा अगदी सुरूवातीचा टप्पा आहे. या टप्प्यात कॅन्सरचं निदान झालेले रूग्ण बरे होतात. हा कॅन्सर शरीराच्या इतर भागात पसरला नसल्यामुळे रूग्ण वाचण्याची शक्यता बरीच जास्त असते. ब्रेस्ट कॅन्सर शरीराच्या कोणत्या भागात पसरला आहे किंवा त्याचा किती धोका आहे हे टप्प्यांवरून कळतं. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर धोकादायक नसतो. या टप्प्यात कॅन्सरच्या पेशी स्तनांच्या इतर भागात किंवा शरीराच्या इतर भागात पसरलेल्या नसतात. काही डॉक्टरांच्या मते स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर हा कॅन्सरपूर्व टप्पा आहे. या टप्प्यात रूग्णाला उपचारांची नाही तर निरिक्षणाची गरज असते. अनेकदा इतर चाचण्या करताना स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरचं निदान होतं. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरमध्ये स्तनांमध्ये गाठ तयार होतेच असं नाही. तसंच ब्रेस्ट कॅन्सरची इतर लक्षणं या टप्प्यात दिसतातच असंही नाही. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर शरीरात पसरला नसला तरी भविष्यातला धोका टाळण्यासाठी उपचारांची गरज असते. उपचारांअभावी हा कॅन्सर शरीरात पसरू शकतो. त्यामुळे वेळीच योग्य ते उपचार होणं गरजेचं असतं. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरच्या प्रकारावरून उपचारांची दिशा ठरवली जाते. योग्य उपचार घेतल्यानंतर स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरच्या १० रूग्णांपैकी नऊ रूग्ण बरे होतात आणि सर्वसामान्य आयुष्य जगू शकतात. ब्रेस्ट कॅन्सरचा कौटुंबिक इतिहास, वय, स्थूलपणा, मुलं नसणं, बैठी जीवनशैली, अतिमद्यपान, स्तनांमध्ये होणारे बदल, मासिक पाळीसंबंधीच्या समस्या, गर्भनिरोधक गोळ्यांचं सेवन या कारणांमुळे स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरचा धोका वाढतो. स्तनांमध्ये गाठी तयार होत नसल्याने स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरचं निदान पटकन होत नाही.

**आरोग्यवेध**

# अवयवांची स्वच्छता राखताना...

शारीरिक स्वच्छता राखताना नेमकं काय करायला हवं याविषयी...

✽ स्वच्छतागृहाचा वापर केल्यावर, काही खाण्याआधी तसंच खाल्ल्यानंतर किंवा बॅक्टेरिया असलेल्या भागाला स्पर्श केल्यानंतर हात स्वच्छ धुवायला हवेत. पण प्रत्येक वेळी बॅक्टेरियाविरोधी हॅंडवॉश किंवा साबण वापरण्याची गरज नसते. हात धुण्यासाठी कोणताही साबण वापरत असलात तरी तो किमान २० सेकंद हातांना नीट चोळायला हवा. तसंच बोटांच्या मध्ये, नखांच्या जवळ आणि हातांच्या मागच्या बाजूलाही साबण लावायला हवा. यामुळे हात नीट स्वच्छ होतील.

✽ चेहऱ्यासाठी आपण वेगवेगळ्या प्रकारची स्क्रब्ज वापरतो. हे स्क्रब वरचेवर वापरल्यामुळे चेहरा खराब होऊ शकतो. चेहऱ्याची मृत त्वचा वारंवार निघते. यामुळे त्वचा कोरडी पडू शकते. हे टाळण्यासाठी तोंड सौम्य फेसवॉशने धुवायला हवं. फेसवॉश चेहऱ्यावर नीट लावायला हवा.



✽ अनेक लोक योग्य पद्धतीने दात घासत नाहीत. अस्वच्छतेमुळे तोंडात आम्लांचं असंतुलन निर्माण होतं आणि दातांवरचं एनामल कमी होतं. हे टाळण्यासाठी ब्रश दातांसमोर ४५ अंशांच्या कोनात धरायला हवा. दातांवर तो गोलाकार फिरवायला हवा.

**आपण कुठे चुकतो?**

✽ कान स्वच्छ करण्यासाठी आपण पेन किंवा काडेपेटीच्या काडीचा वापर करतो. यामुळे कानांच्या पडद्यांना इजा पोहचू शकतो. अशा गोष्टींच्या वापरामुळे माणूस बहिराही होऊ शकतो. कानांच्या आतल्या भागाला स्वच्छतेची गरज नसते. हा भाग आपोआप स्वच्छ होत असतो. तुम्हाला कानांचा बाहेरचा आणि मागचा भाग स्वच्छ करायचा असतो. कानांचा मागचा भाग स्वच्छ करणंही खूप गरजेचं असतं.

✽ केस धुताना टाळूकडे दुर्लक्ष होतं. लांब आणि जाड केस असलेले लोक टाळूच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात. अनेकदा शँपू आणि कंडिशनर तसाच राहतो. जाड केस असणाऱ्यांनी सौम्य शँपूने टाळूवरची त्वचाही धुवायला हवी.

✽ बेंबीचा भागही स्वच्छ धुवायला हवा. बेंबीमध्ये जीवाणूंचा वास असतो. पण आंघोळ करताना आपण बेंबी स्वच्छ करायला विसरतो. कोमट पाणी आणि साबणाने बेंबी स्वच्छ करायला हवी. बेंबी स्वच्छ करण्यासाठी कापसाच्या बोळ्याचा वापर करता येईल.

**नवसंशोधन**

## आहारातलं लाभदायी फायबर


फळं, भाज्या, पूर्ण धान्य यामध्ये आढळणारं फायबर आरोग्यासाठी उपयुक्त असल्याची बाब एका संशोधनातून समोर आली आहे. या फायबरमुळे वय वाढताना होणारा मेंदूचा दाह कमी होतो, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. आहारातून मिळणाऱ्या फायबरमुळे पोटात चांगल्या बॅक्टेरियांची निर्मिती होते. हे बॅक्टेरिया फायबर पचवतात. त्यावेळी शॉर्ट चेन फॅटी ॲसिड्सची निर्मिती होते. यात बटीरेटचाही समावेश असतो. बटीरेटमध्ये दाह कमी करण्याचे गुणधर्म असल्याची बाब समोर आली आहे. युनिव्हर्सिटी ऑफ इलिनॉइसच्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं. उंदरांवर संशोधन करण्यात आलं. बटीरेटमुळे उंदराची स्मरणशक्ती सुधारल्याची बाबही समोर आली आहे.




**डोळ्यांचं आरोग्य**

## इलेक्ट्रॉनिक उपकरणं ठरतात मारक

स्मार्टफोन, लॅपटॉप्स तसंच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधून बाहेर पडणारा निळा प्रकाश डोळ्यांसाठी घातक असल्याचं अनेकदा बोललं गेलं आहे. ही बाब संशोधनातूनही समोर आली आहे. या निळ्या प्रकाशाच्या सततच्या संपर्कामुळे अंधत्व येऊ शकतं, असं शास्त्रज्ञांनी म्हटलं आहे. अर्थात हा अभ्यास उंदरांवर करण्यात आला. या संशोधनात निळ्या प्रकाशाच्या धोक्यांबद्दल सांगण्यात आलं आहे. मोबाईलचा अतिवापर शरीरावर वेगवेगळ्या प्रकारे प्रभाव टाकू शकतो. डोळे कोरडे होणं, डोळ्यांमधून पाणी येणं, झोप न येणं अशा धोक्यांवर या संशोधनातून प्रकाश टाकण्यात आला आहे.



**दंतारोग्य**

## वापरा इलेक्ट्रॉनिक ब्रश

दात घासताना आपण बऱ्याच चुका करतो. हे टाळण्यासाठी आपण इलेक्ट्रिक ब्रशचा वापर करू शकतो. इलेक्ट्रिक ब्रशमुळे दाताचा प्रत्येक कोपरा स्वच्छ होतो. विशेष बाब म्हणजे आपले दात वैज्ञानिक पद्धतीने स्वच्छ होतात. बटण दाबल्यानंतर ब्रशचं काम सुरू होतं. दातांमध्ये अडकलेले सगळे कण निघून जातात आणि तोंडाच्या बऱ्याच समस्याही कमी होतात. त्यामुळे वेगळा प्रयोग म्हणून इलेक्ट्रॉनिक ब्रशचा वापर करायला हरकत नाही.



**आजीबाईंचा बटवा**

## उपयुक्त चंदनाचं तेल

चंदनाचं तेल आणि चंदनाची पूड विविध औषधांमध्ये तसंच सौंदर्यप्रसाधनांमध्ये वापरली जाते. गेल्या चार हजार वर्षांपासून चंदनाचा वापर केला जात आहे. चंदनाच्या तेलामुळे शरीराला थंडावा मिळतो. दाह, जळजळ कमी होते. चंदनामुळे पचनशक्ती सुधारते. पोटातल्या गॅसचं प्रमाण कमी होतं. नव्याने गॅस तयार होत नाही. जखमा बऱ्या करण्याचे गुणधर्मही यात असतात. खोकला तसंच बसलेल्या घश्यासाठीही चंदनाचं तेल वरदान मानलं जातं. रक्तदाब कमी करण्यासाठी चंदनाचं तेल दुध किंवा पाण्यासोबत घेता येईल.



# राज्यात सुरु असलेली सर्व शासकीय कामे ७ मे पासून बंद करण्याचा ठेकेदारांचा निर्णय

## अनेक प्रलंबित प्रश्न व अडचणी सोडविण्याकडे शासनाचे दुर्लक्ष

नगर – सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, जलजीवन मिशन व जलसंधारण या विभागाकडे काम करणाऱ्या कंत्राटदार यांचे अनेक प्रश्न व अडचणी सोडविण्यासाठी शासन, मंत्री व प्रशासन यांच्या पातळीवर पाठपुरावा करून ते सुटलेले नाहीत. शासनाच्या या उदासीन धोरणाविरोधात ७ मे पासून विकासकामे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील सर्व शासकीय विभागातील विकासकामे करणारे कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता, छोटे विकासक अशा समावेश असलेल्या – राज्यातील प्रमुख. कंत्राटदार संघटनाची शुक्रवारी (दि. ३) ऑनलाईन बैठक पार पडली. यात ७ मे पासून राज्यातील सर्व विभागातील शासनाची विकास कामे बंद करण्याचा निर्णय राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना, जलजीवन कंत्राटदार महासंघाने घेतला आहे.

कंत्राटदारांच्या मागणीमध्ये सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास जलजीवन मिशन, जलसंधारण विभागाकडील विकासाची कामे करणाऱ्या कंत्राटदार यांची देयके तातडीने देण्यात यावी. राज्यातील सर्व विभागाकडील विकासाची कामे मंजूर करण्याच्या अगोदर या कामांस निधीची उपलब्धता असल्याशिवाय निविदा प्रक्रिया राबवण्यात येऊ नये. राज्यात गेल्या काही कालावधीत हजारो .कोटींची विकास कामे मंजूर केली आहेत. या सर्वांची निविदा एकाच वेळी प्रसिद्ध करून टेंडर ही काढले आहेत व निविदा ही झाल्या आहेत. या कामांचे डिपॉझिट म्हणून कंत्राटदार याचे अंदाजे १० हजार कोटी शासनाकडे जमा झाले आहेत. ही कामे पुर्ण अथवा काही प्रमाणात झाल्यानंतर या कामांना पर्यायाने कंत्राटदार यास निधी कधी मिळणार कंत्राटदार विकासक यांना नाही. तसेच राज्यभर कामे करतांना या कंत्राटदार यांना स्थानिक नेते, राजकीय मंडळी व इतर अनेक उपद्रवी लोकांचा त्रास होत आहे. यामुळे शासनाच्या विकासाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांसाठी संरक्षण कायदा लागू करावा, अशी मागणी आहे.

यासह कामे पूर्ण झाल्यावर बिल तातडीने मिळावे, याबाबत कंत्राटदारसंघांची मागणी आहे. यामुळे राज्यातील ७ मे पासून संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा पुढील निर्णय होईपर्यंत काम बंद करण्याचा निर्णय कालच्या बैठकीत एकमताने महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य जलजीवन कंत्राटदार व राज्य अभियंता संघटनाच्या पदाधिकारी यांनी एकमताने घेतला आहे. संघटनेच्या निर्णयाची माहिती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना कळवण्यात आली असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष मिलींद भोसले, अमोल सातपुते यांनी दिली.

# नगर शहर परिसरातून आणखी २ अल्पवयीन मुली झाल्या बेपत्ता

## फुस लावून पळवून नेल्याचा संशय, २ वेगवेगळे गुन्हे दाखल

नगर – नगर शहरातून तसेच तालुक्यातील एका गावातून दोन अल्पवयीन मुलींना अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. याप्रकरणी पीडित मुलींच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली व नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

तेलीखुंट परिसरात राहणार्या एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला गुरूवारी (दि. २) दुपारी अज्ञात व्यक्तीने मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा गुन्हा तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल झालेला असतानाच केडगाव उपनगरातुनही एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याचे समोर आले आहे. केडगाव उपनगरात राहणाऱ्या पिडीत मुलीच्या वडिलांनी याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या अल्पवयीन मुलीचे त्यांनी गुरूवारी (दि.२) सकाळी एका शाळेत ॲडमिशन केले व तिला घरी सोडले. फिर्यादी कामावर निघून गेले असता मुलगी केडगाव परिसरात राहणाऱ्या आजीकडे जाते असे सांगून घरातून बाहेर पडली. ती आजीकडे गेलीच नसल्याचे समोर आले आहे. तिला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस मुलीचा शोध घेत आहेत.

दरम्यान नगर तालुक्यातील वाळुंज गावच्या शिवारातूनही एका अल्पवयीन मुलीला आरोपी प्रशांत बापू खंडागळे (रा. कारखेल, ता.आष्टी, जि. बीड) याने कशाची तरी फुस लावून पळवून नेल्याची घटना समोर आली आहे. याबाबत मुलीच्या आईने शुक्रवारी (दि.३) नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून या फिर्यादी वरून पोलिसांनी आरोपी प्रशांत खंडागळे याच्या विरुद्ध भा.दं.वि.कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# मतदार जनजागृतीसाठी 'मैं तेरा-१३ में' रिल्स बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन

## १० मेपर्यंत रिल्स, व्हिडिओ पाठवावेत, भरघोस पारितोषिके

नगर – जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सिद्धाराम सालीमठ यांच्या निर्देशानुसार अहमदनगर-शिर्डी लोकसभा मतदारसंघातील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी १०० टक्के मतदानाची भूमिका बजवावी. त्याचबरोबर मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी व मतदारांमध्ये जनजागृती होण्यासाठी अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांच्या संकल्पनेतून 'मै तेरा-१३ मे' या रिल्स बनविणे स्पर्धेचे अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. बनविण्यात आलेल्या रिल्स, व्हिडिओ ९००२१०९००३ या व्हाट्सअप क्रमांकावर १० मे पर्यंत पाठविण्याचे आवाहनही स्वीप समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

मी माझ्या लोकशाहीचा पाईक असून १३ मे रोजी मतदान करून लोकशाहीतील या महत्त्वपूर्ण दिवसाचा सन्मान करील या भावनेने या स्पर्धेचे नाव मै तेरा-१३ मे... असे ठेवण्यात आले असून विजेत्या स्पर्धकांना भरघोस पारितोषिके प्रदान केली जाणार आहे. स्पर्धेसाठी १) उत्सव निवडणुकीचा-अभिमान देशाचा, २) माझं मत – माझा अधिकार, ३) आपले अहमदनगर/ शिर्डीचे मतदान १३ मे रोजी आहे – जरूर मतदान करा. हे तीन विषय असून तीस सेकंद ते एका मिनिटाच्या रिल्स बनवणे आवश्यक आहे. रिल्समध्ये कोणत्याही राजकीय व्यक्तीचे नाव, उमेदवाराचे नाव, राजकीय पक्षाचे नाव, निवडणूक चिन्ह असू नये. तसेच रील बनवताना आदर्श आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक आहे. रिल्स सोबत स्वतःचे संपूर्ण नाव पूर्ण पत्त्यासह सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी देशातील पहिल्या अहमदनगर स्वीप केअर असलेल्या ९००२१०९००३ या व्हाट्सअप क्रमांकावर १० मे पर्यंत पाठवावेत.

SVEEP- स्वीप या शब्दाचा अर्थ Systematic Voter's Education and Electoral Participation म्हणजेच निवडणूक – मतदान प्रक्रियेत मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग असा अर्थ होतो.

जास्तीत जास्त रिल्सप्रेमी व सजग मतदारांनी मतदार जनजागृती विषयक रिल्स पाठवावेत, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, राहुल पाटील, अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी), मीना शिवगुंडे (स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी), आकाश दरेकर (स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी), प्रदीप पाटील (तहसीलदार निवडणूक), बाळासाहेब बुगे (उपशिक्षणाधिकारी), प्रशांत गोसावी (निवडणूक नायब तहसीलदार), डॉ.अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत) व सर्व स्वीप समिती सदस्य आदींनी केले आहे.

# 'चाणक्यनीती'ने मुलांना वाढवल्यास ते उत्तम शिक्षण घेवून आदर्श नागरिक होतील

### ॲड.किशोर देशपांडे



सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमधील युकेजी मधून पहिलीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवीदान समारंभात प्रमाणपत्र देताना सेन्ट्रल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.किशोर देशपांडे.

## सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये चिमुकल्यांचे पदवीदान समारंभ उत्साहात

नगर – विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांचा विशेषतः त्याच्या आईचा महत्वाचा रोल असतो. पालकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या पद्धतीने अभ्यास करून द्यावा. त्यांच्यावर आपल्या अतिरिक्त अपेक्षांचा भार टाकू नका. आर्य चाणक्य सांगून गेलेत कि, वयाच्या ५ वर्षापर्यंत मुलांवर प्रेम करा, ५ ते १५ वयापर्यंत त्यांना शिस्त लावा व १५ पासून पुढे त्यांना आपले चांगले मित्र बनवा. मुलांना या चाणक्यनीतिप्रमाणे वाढवल्यास ते उत्तम शिक्षण घेवून आदर्श नागरिक होवून कुटुंबाचे व शाळेचेही नाव उंचावतील यात शंकाच नाही. सध्याचे विद्यार्थी नशीबवान आहेत कारण त्यांना कॉम्पुटर शिक्षणासह कृत्रिम बुद्धिमत्तेच्याही सुविधा आता मिळत आहेत. स्वामी विवेकानंद यांच्या नावाने चालणाऱ्या या शाळेत सर्व क्षेत्राच्या सर्वोत्तम सुविधा असल्याचे पाहून समाधान वाटते, असे प्रतिपादन सेन्ट्रल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.किशोर देशपांडे यांनी केले.

सिंधी एज्युकेशन सोसायटीच्या सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मधील युकेजी मधून पहिलीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ नुकताच उत्साहात झाला. महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या पदवीदान समारंभाप्रमाणे शाळेतील सर्व बाल विद्यार्थ्यांनी काळा गाऊन व डोक्यावर टोपी परिधान केली होती. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते त्यांना पदवी प्रमाणपत्र देवून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देवून २०२४ च्या शैक्षणिक वर्षाचा उत्साहात समारोप करण्यत आला.

या निमित्त आयोजित कार्यक्रमात सेन्ट्रल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.किशोर देशपांडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिंधी एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन राम मेंघानी होते. यावेळी सचिव सीए. महेश मध्यान, खजिनदार सुरेश हिरानंदानी, हायस्कूलच्या प्राचार्य गीता तांबे, माध्यमिकच्या प्राचार्य कांचन पापडेचा, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका गोदावरी कीर्तनी आदींसह सर्व शिक्षक, पदवी घेणारे विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

सीए. महेश मध्यान म्हणाले, एलकेजी, युकेजी हा शिक्षणाचा पाया आहे. हा पाया येथे भक्कम केला जातो. सर्व इयत्तांचा प्रत्येकवर्षी १०० टक्के निकाल लागून शाळेची प्रगती उंचावत आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या मेहनती बरोबरच शाळेच्या शिक्षकांचे परिश्रम महत्वाचे आहेत.

माध्यमिकच्या प्राचार्य कांचन पापडेचा यांनी प्रास्ताविक केले. हायस्कूलच्या प्राचार्य गीता तांबे यांनी शाळेच्या उपक्रमांची माहिती दिली तसेच प्राथमिकच्या मुख्याध्यापिका गोदावरी कीर्तनी यांनी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशाची माहिती दिली. यावेळी सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून आर्या अकोलकर व शिवन्या मेहतानी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सर्वोत्तम खेळाडू म्हणून जय चव्हाण व स्वयं तांदळे यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशा रंगलानी यांनी केले. गीता दुमटे यांनी आभार मानले.

# छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रा. आदिनाथ लवांडे यांची ३९ संदर्भ पुस्तकांची भेट



प्रा.आदिनाथ लवांडे यांनी छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ३९ संदर्भ ग्रंथ भेट दिले. त्याचा स्विकार करताना प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे. समवेत प्रा. पी. जी. निकम, प्रा.ए.बी काळे, प्रा.एस. एम. पळसकर.

नगर – 'शिक्षणाची भेट ही सर्वात मोठी देणगी' हे ब्रीद समोर ठेवून आणि 'पुस्तक दान करा' हा उद्देश घेऊन समाजातील बरीचशी अभ्यासू मंडळी विद्यार्थ्यांना आवश्यक असे पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी नेहमी तत्पर असतात त्यापैकीच एक म्हणजे प्रा. आदिनाथ लवांडे की ज्यांनी नुकतेच नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तब्बल ३९ संदर्भ पुस्तके भेट म्हणून दिली आहेत. प्रा. आदिनाथ मारुती लवांडे यांनी शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर या ठिकाणी अधिव्याख्याता म्हणून काम पाहिलेले आहे, आणि सेवानिवृत्तीनंतर देखील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्याची आवड त्यांनी आजही जोपासली आहे.

प्रा. आदिनाथ लवांडे यांनी स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील ११ तसेच यंत्र अभियांत्रिकी क्षेत्रातील २८ असे एकूण ३९ पुस्तके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांच्याकडे २७ एप्रिल रोजी सुपूर्त केली. महाविद्यालयीन अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमाची अगदी विस्तृतपणे माहिती या संदर्भ पुस्तकांमध्ये असते.

व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अत्यंत सविस्तर स्वरूपात माहिती पुरवणारे संदर्भ पुस्तके अतिशय उपयुक्त असून विद्यार्थ्यांच्या नवनवीन संशोधनासाठी अशा स्वरूपाची पुस्तके अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकणारी ही पुस्तके महाविद्यालयास भेट दिल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी तसेच शिक्षकांनी प्रा. आदिनाथ लवांडे यांचे मनापासून आभार व्यक्त केले. याप्रसंगी सिव्हिल विभाग प्रमुख प्रा. पी. जी. निकम, मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा. ए. बी. काळे तसेच सिव्हिल विभागाचे प्रा. एस. एम. पळसकर आदी शिक्षक उपस्थित होते.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे तसेच संस्था सदस्य-पदाधिकारी या सर्वांनी 'पुस्तक दान संकल्प' हा एक शैक्षणिक, सामाजिक व अत्यंत स्तुत्य उपक्रम असून पुस्तके हे शिक्षक आणि मार्गदर्शक या दोन्हीही भूमिका पार पडतात अशा शब्दांमध्ये या उपक्रमाचे कौतुक केले.

# मतदारांमध्ये जागृतीसाठी लोकभज्ञाक चळवळीचा पुढाकार; राजकारण, समाजकारण आणि अध्यात्माचा त्रिवेणी संगम

नगर – राजकारण, समाजकारण आणि अध्यात्म या तिन्हींचा त्रिवेणी संगम साधत मतदारांमध्ये जागृती करण्यासाठी लोकभज्ञाक चळवळीने पुढाकार घेतला आहे. तर चांगले उमेदवार निवडून देऊन सत्तापेंढारी यांना घरचा रास्ता दाखविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा डिचू कावा तंत्राचा अवलंब करण्याचे आवाहन या चळवळीच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

भारतातील लोकशाहीचे मूळ आठव्या शतकात दक्षिण भारतात सुरू झालेला भक्ती मार्ग चळवळीतून देशभर भक्ती क्रांती झाली. परंतु या भक्ती मार्गात सर्वश्रेष्ठ परमात्म्याची भक्ती यावर जोर होता. महात्मा गांधीजींनी भक्ती मार्गाचे रूपांतर लोकभक्ती मार्गात केले. सजीवांच्या ठिकाणी सर्वश्रेष्ठ परमात्म्याचे चैतन्य पसरलेले आहे आणि सजीवांची भक्ती हाच भक्ती मार्गाचा श्रेष्ठ मार्ग आहे. म्हणून गांधीजींनी सर्वोदय आणि अंतोदय चळवळी सुरू केल्या. हिंदू आणि जैन धर्मियांनी अहिंसा आणि सत्य याला महत्त्व दिले. त्याचा गांधीजींनी पूर्णपणे स्वीकार केला. महात्मा गांधीजींनी ५ हजार वर्षापासून सुरू असलेल्या देशातील भक्ती, ज्ञान आणि कर्म यावर आधारित लोकभक्तीवर सत्याग्रही चळवळ सुरू केली आणि स्वातंत्र्य मिळवण्यासाठी निस्वार्थ भावनेने देशाच्या जनतेची सेवा केली. गांधीजींच्या लोकभक्ती मार्गाचा पूर्णपणे अवलंब करून, लोकभज्ञाक चळवळ नव्याने सुरू झाली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकांची भक्ती, त्यांचे प्रश्न, प्रश्न सोडवण्याचे ज्ञान आणि निष्काम सेवा याचा स्वीकार या लोकभज्ञाक चळवळीने केला आहे. त्याचा भाग म्हणून वन्य प्राण्यांसाठी भीम हनुमान बंधारे बांधणे, धनराई योजना राबविणे इत्यादी कामांना चळवळीने प्राधान्य दिले आहे. लोकभज्ञाक चळवळ ही राजकारण, समाजकारण आणि अध्यात्म या तिन्हींचा त्रिवेणी संगम आहे. जगातील इतर देशांमध्ये असणाऱ्या लोकशाहीपेक्षा लोकभज्ञाकशाही ही सर्वश्रेष्ठ शासन प्रणाली आहे. त्यामुळे या चळवळीच्या माध्यमातून लोकांच्या आणि सर्व सजीवांचे कल्याण नक्कीच होऊ शकणार असल्याची भावना ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केली.

सध्या सत्ता-संपत्ती आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी सत्तापेंढारी प्रयत्नशील आहे. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतकोंबाड आणि ढब्बुमकात्या या दोन प्रवृत्तीच्या लोकांनी उच्छाद सुरू केला आहे. मतकोंबाड म्हणजे कोंबडी आणि पैशाच्या बदल्यात मुलांची व माणसांची शपथ घेऊन मत देणारे समाजभ्रष्ट लोक आणि मला काय त्याचे असे म्हणणारे आणि मतदानापासून दूर राहणारे ढब्बुमकात्या प्रवृत्तीचे लोक लोकभज्ञाक चळवळीमुळे बदलल्याशिवाय राहणार नसल्याचेही ॲड. गवळी यांनी म्हंटले आहे.

संपूर्ण देशात जय शिवाजी जय डिचूकावा या महामंत्राचा वापर लोकभज्ञाक चळवळीने सुरू केला आहे. जे सत्तापेंढारी आपल्याला पैशाच्या बदल्यात विकत घेऊ पाहत आहेत; ते देशाच्या तिजोरीवर डल्ला मारल्याशिवाय राहणार नाही. याची जाणीव प्रत्येक मतदारांनी ठेवली पाहिजे. मतदानाच्या वेळी अशा सत्तापेंढारी यांना मत न देता सार्वजनिक जीवनातून संपवणे आणि चांगल्या माणसाला निवडून आणणे याशिवाय मतदारांसमोर काही एक पर्याय नसल्याचे आवाहन करण्यात आले आहे. या अभियानासाठी ॲड. गवळी, अशोक सब्बन, ओम कदम, प्रकाश थोरात, जालिंदर बोरुडे, शाहीर कान्हू सुंबे, विठ्ठल सुरम आदी प्रयत्नशील आहेत.







# बिरोबा महाराज यात्रा उत्सवानिमित्त निमगाव वाघात कावडीची मिरवणूक

## वीस वर्षापासून कावडीने गंगाजल आणणाऱ्या युवकांचा सन्मान



निमगाव वाघा गावात बिरोबा महाराज यात्रोत्सवात कावडीच्या मिरवणुकात सहभागी झालेल्या गंगाजल आणणाऱ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करताना पै. नाना डोंगरे. समवेत नामदेव भुसारे, बाळू भुतारे, बाबा जाधव, बाबा पुंड आदी.

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त मागील वीस वर्षापासून कावडीने गंगाजल आणणाऱ्या युवकांचा वीरभद्र बिरोबा देवस्थान, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त गावातील युवक अनेक वर्षापासून कावडीने गंजाजल आनत आहे. नुकतेच गावातील युवकांनी कावडीने गंगाजले आणले. यावेळी गावातून मोठ्या उत्साहात कावडीची डफ, ढोल, ताशे व लेझीम पथकासह मिरवणूक काढण्यात आली. तर श्रीबिरोबा महाराजांच्या मूर्तीस गंगाजलाने अभिषेक घालून विधीवत पूजा करण्यात आली. वीस वर्षापासून कावडीने गंगाजल आणणारे विजय जाधव, अंबादास निकम, राजू भुसारे, दत्तात्रय शिंदे, सचिन उधार, ज्ञानदेव जाधव, भाऊ साळवे आदींचा देवाचे भगत नामदेव भुसारे व डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाळू भुसारे, बाबा जाधव, पांडुरंग गुंजाळ, बाबा पुंड, संजय डोंगरे, रामदास वाखारे, रावसाहेब भुसारे, युवराज भुसारे आदी उपस्थित होते.

श्री बिरोबा मंदिरात पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. गावात रात्री रेखा सविता नगरकर यांचा लोकनाट्य तमाशा मंडळाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. तर छबीना मिरवणुकीत ग्रामस्थ सहभागी झाले होते. युवकांनी केलेल्या फटाक्यांच्या आतषबाजीत आसमंत उजळून निघाला. यावेळी उद्योजक अरुण फलके, किरण जाधव, संदीप डोंगरे, अरुण कापसे, अनिल डोंगरे, वैभव फलके आदी उपस्थित होते.

# कार्यालयातून सोन्याच्या दागिन्यांची चोरी

नगर – मंगल कार्यालयात विवाह सोहळ्याची गडबड सुरु असताना अज्ञात चोरट्याने 'हातसफाई' करत महिलेचे ३ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील प्रियदर्शनी मंगलकार्यालयात घडली.

याबाबत सुनंदा रावसाहेब टकले (वय ६०, रा. भोयरे पठार, ता.नगर) यांनी शुक्रवारी (दि.३) दुपारी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी टकले या बुधवारी (दि.१) दुपारी एका विवाह सोहळ्यासाठी नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील प्रियदर्शनी मंगलकार्यालयात गेल्या होत्या. त्या विवाह सोहळ्याच्या गडबडीत असताना दुपारी ३ ते ५ या कालावधीत अज्ञात चोरट्याने त्यांच्या कडील ३ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र त्यांची नजर चुकवून चोरून नेले.

याबाबत त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.दं.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

